प्रकरण २ रे

१९ व्या शतकातील महाराष्ट्रातील स्त्री जीवन त्या संदर्भातील विविधज्ञानविस्ताराची कामगिरी

प्रस्तावना:-

पाश्चात्य राजवटीची महाराष्ट्रातील सुरवात देखील बंगाल, पंजाब, गुजराथ प्रमाणे नवी मूल्ये प्रस्थापित करण्यासाठी प्रेरक ठरली. आजवर आपल्या भारतीयांवर अनेक धर्मांची धार्मिक व राजकीय आक्रमणे झाली पण स्थित्यंतर आणि परिवर्तनाचा विचार त्यांच्यामुळे कधीच मनात आला नाही. परकीय आक्रमणे झाली, काहीकाळ त्यांनी सत्ता गाजवली आणि परत त्यांचे सामर्थ्य कमी होताच ती सत्ता लयास गेली. त्यांचे अधिपत्य आपल्या विचार आचार संस्कृतिवर फारसे प्रभावीपणे गाजले नाही. अराजकता आणि अस्थिरता निर्माण करून हे राज्यकर्ते इतिहास जमा झाले. फक्त अकबराची सत्ता यास अपवादात्मक आहे. संपत्तिची लयलुट, पाशवीवृत्ती, जुलमी राजवट, क्रूर सत्तापिपासूपणा, पिळवणूक व बळजबरीने स्वधर्माचा प्रचार या पलीकडे त्यांच्या सत्तेत दूसरे काही नव्हते. त्यामुळे भारतीय समाजाची घडी थोडी सुध्दा विस्कटली नव्हती. चातुर्वर्ण्यावर आधारलेली आपली समाज रचना दुर्दैवाने आपले वैभव अंतर्बाह्य पोखरून कुचकामी झाली होती आणि अशा अवस्थेत "व्यक्ती स्वातंत्र्य विज्ञाननिष्ठा, मनुष्यत्वाची प्रतिष्ठा, नवी धर्म भावना इ. मूल्ये घेऊन इंग्रजी राजवट भारतात स्थिर झाली."[१] उदारमतवादी वृत्ती, भूतदयेचा अंतर्मनात असलेला विशाल दृष्टीकोन, व्यापारी वृत्तीच्या दृष्टीकोनातून प्रस्थापित झालेली सार्वभौमता, स-हृदय, व संवेदनशील व्यापक धार्मिकदृष्टी, स्वातंत्र्य, समता आणि बंधूता या तत्वत्रयीची उपासक असणारी इंग्रजी राजवट भारतीयांच्या परंपरावादी रूढी

ग्रस्त, समाजरचनेला धक्के देणारी ठरली. इंग्रजी राजवट ही जणू गलथान-पणे झोपी गेलेल्या भारतीयांची अस्मिता जागृत करण्यासाठी ईश्वरी संकेतानी प्रस्थापित झाली. अशी मते स्वदेशाभिमान असणाऱ्या सुधारकांनी व्यक्त केली आहेत. जिज्ञासा आणि ज्ञानलालसा हे ब्रिटिशांच्या कर्तबगारीचे व वैभवाचे दोन पैलू होते. आणि म्हणूनच स्वकर्तृत्वाने जवळजवळ सबंध देशावर त्यांनी आपली सत्ता प्रस्थापित केली होती.

नव्या युगाची पहाट:-

१८१८ मध्ये पेशवाईचा अंत झाला व ख-या अर्थाने महाराष्ट्रात ब्रिटिशांची सत्ता प्रस्थापित झाली पण त्याही पूर्वी १७८४ साली कलकत्ता येथे इंग्रजांनी आपल्या साम्राज्याचा पाया रोवला होता व तेथून जीवनाकडे बघण्याचा दृष्टीकोन बदलण्यास सुरवात झाली होती. परिवर्तनाचे चक्र ज्ञानाच्या माध्यमातून विविध क्षेत्रात फिरू लागले होते. इंग्रजांनी संबंध भारतवासीयांचे राज्यच जिंकले नाही तर त्यांची मनही जिंकून घेतली होती.

ब्रिटिशांचे आगमन होण्यापूर्वी सतत होणाऱ्या परकीय आक्रमणांमुळे समाज हवालदिल झाला होता. त्यांचे जीवन अस्थिर, असुरक्षित व अस्ताव्यस्त बनले होते. त्यांची संपत्ती, त्यांचे शील वारंवार लुटले जात होते तर उच्चभ्रू समजला जाणारा समाज, विलक्षण सुखलोलुप बनला होता. अध्ययनाचे अधिकार धर्माच्या नावाखाली स्वत:च्या हातात घेऊन ब्राम्हण, विलासवृत्तीच्या गर्तेत पडला होता व बहुजन समाज ज्ञानाला वंचित झाला असल्या मुळे त्याला वाटेल तसे लुटण्यात ब्राम्हण, क्षत्रिय, वैश्य लोक जीवनाची इतिकर्तव्यता मानत होते. एकीकडे धर्माच्या नावावर माजविलेले कर्मकाण्ड आणि त्याला पुरक ठरणारी क्रूर, जुलमी, स्वार्थी वृत्ती. या जीवघेण्या बेबंदशाहीला सत्तांधतेला इथला माणूस विलक्षण कंटाळला होता म्हणून "येथील जुलमी सत्ताधाऱ्याच्या हातातून लोकांना जर एखाद्या सुसंस्कृत नेत्याने मुक्त केले तर त्यांचे खरे कल्याण होईल. इतकेच नव्हे तर या देशातील सर्वात उत्कृष्ट माणसाच्या हाती राज्य जाण्यापेक्षा युरोपातील सर्वात नीच माणसाच्या

हाती राज्य गेले तरी ते तेथील लोकांना अधिक चांगले वाटेल."[२] अशी इथल्या लोकांची वृत्ती झाली होती असे मॅकॉलेने आपल्या रोजनिशीत लिहून ठेवले आहे. युरोपातील नीच म्हणावल्या जाणाऱ्या माणसाच्या अंत:करणात जेवढी भूतदया, माणूसकी, चांगुलपणा होता तेवढा आपल्यातील उच्च समजल्या जाणाऱ्या माणसात नव्हता.

आपल्या खिळखिळ्या झालेल्या समाजाला आसरा, दिलासा देणारा धर्म इंग्रजांच्या समोर इथे स्थापन झाल्यावर ख-या अर्थाने परिवर्तनाला सुरवात झाली आणि तिथूनच सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक क्षेत्रांत नव्याने मानवी मूल्यांचे मूल्यमापन होऊ लागले हे प्रबोधनाचे प्रवाह माणसाच्या सर्वांगीण जीवनाला स्पर्श करून वाहणारे होते. सर्वसामान्यांची होणारी पिळवणूक, ब्राम्हणांनी धर्माच्या नावाखाली माजविलेली अराजकता, ज्ञानाची बंद केलेली दारे, जातिभेद, स्पृश्य, अस्पृश्यता, यांच्या नावावर स्वत:चे अमानुष वर्चस्व गाजविणारा उच्चभ्रू समाज, कर्जाच्या नावाखाली पिळवणूक करणारा व्यापारी, समाजाचे संरक्षण करण्याच्या ऐवजी त्यांना लुटणारा क्षत्रिय, यांनी समाज सर्व बाजूंनी पोखरून टाकला होता आणि या सर्वांच्यात भरडून, होरपळून निघणारे स्पृश्याप्रमाणेच स्त्री जीवन कल्पनेबाहेर पोखरून निघाले होते. रूढी आणि परंपरेची जोपासना करणे म्हणजे संस्कृति आणि धर्म नियमांचे पालन करणे मग तो नियम भले ईश्वरालाही मान्य नसला तरी धर्माचे कर्मकाण्ड करणाऱ्या ब्राम्हणांना मान्य असावा. तिच नितीमत्ता खरी, जी ब्राम्हणांनी धर्माच्या नावाखाली आचरणांत आणावयाचा आदेश दिला आहे. धर्माच्या नावाखाली भ्रष्ट आचार विचार परंपरा, रूढी याला स्त्री बळी पडली. तरी त्याची खंत त्यांना नव्हती. इतकी त्यांची वृत्ती निर्दावलेली होती."राजसत्ता जशी भ्रष्ट तशीच धर्मसत्ता अंध व क्रूर वाघा लांडग्यांचे -हदयात असेल तितकीहि सहृयता रूढीग्रस्त धर्मगुरूंच्या व शास्त्री पंडीतांच्या ठायी आपल्या रक्तामांसांच्या मायभगिनीच्या बाबतीतही उरली नव्हती."[३] आणि म्हणूनच स्त्रियांची होणारी विटंबना उघड्या डोळ्यांनी बघावला इथला समाज सोकावला होता. बंगाल मध्ये सतीची प्रथा लोकांच्यात इतकी

रूढ झाली होती की जीवंत स्त्रीला मृत पतीच्या चितेवर जाळणे म्हणजे फार मोठे धार्मिक कृत्य आपण करतोय. ही प्रथा अंध:श्रध्देवर पोसल्या गेलेल्या मनाला कृतार्थताप्राप्त करून देणारी होती. आणि हा अमानुषपणा इंग्रजांना बघवत नव्हता. स्त्रियांची होणारी ही विलक्षण कुचंबणा धर्माच्या नावाखाली इथला समाज उघड्या डोळ्यांनी बघतो यापेक्षा पाशवी वृत्ती काय असू शकेल.

नव्या युगाची पहाट घेऊन आलेल्या इंग्रजांच्या स-हृदय, मानवतावादी वृत्तीने स्त्री जीवनाची होणारी ससेहोलपट थांबवली; राजाराममोहनराय यांनी प्रथम या सती रिवाजां विरुध्द आवाज उठवला. धर्म शास्त्र पुराणाची उकल करून दाखविली, माणसाचे जीवन फुलविणारा तो धर्म, माणसाचे जीवंत दहन करणारा नियम हा अधर्म आहे. आणि हे कृत्य थांबवणे अतिशय महत्वाचे आहे. ब्राम्होसमाजाची स्थापना करून प्रथम राजाराममोहनराय यांनी पाश्चात्य शिक्षणाचा स्विकार करून हिंदू धर्मातील अराजकता आणि अवास्तवता, साधार स्पष्ट करून स्त्रीयांवर होणारा हा अमानुष अन्याय थांबविला. स्त्रीयांना स्वतंत्र मन, बुध्दी, भावना, आकांक्षा असतात याचा विचार इथल्या लोकांच्या मनाला स्पर्शून जाऊ लागला. राजाराममोहन राय यांनी प्रामुख्याने स्त्रीयांवर होणा-या अन्यायाला वाचा फोडली. स्त्री स्वातंत्र्याची व्यापक व विशाल दृष्टी समोर ठेवून त्यांचे प्रश्न सोडवण्याचा प्रयत्न केला. स्त्री विषयक प्रश्नांकडे डोळसपणे बघायला सुरवात केली. स्त्रीला वडिलार्जित मालमत्तेत अधिकार असावा, स्त्रीला आर्थिक स्वातंत्र्य मिळावे, बालविवाह आणि कन्याविक्रय थांबवावा आणि सर्वात महत्वाचे म्हणजे सतीची चाल बंद करावी, कर्मठपणा आलेल्या धर्माने, ग्रंथप्रामाण्याच्या अतिरेक केलेल्या धर्मपारंगतांनी विचारांची दिशा कुंठीत केलेल्या धर्मतज्ञांनी कर्तव्यबुध्दीला काळाच्या कसोटीवर घासून आजमावून बघावे. स्वत:चा अहंकार आणि अधिकार सिध्द करण्यासाठी ब्राम्हणांनी जो हा सतीचा स्त्रियांचा बली यज्ञ चालविला आहे तो थांबला जावा. बहुजन समाज किंकर्तव्यमूढ झालेला असल्याने हा अन्याय तो फक्त उघड्या डोळ्यांनी, तडफडणा-या अंत:करणानी बघतोय

पण त्याविरुध्द आवाज उठवू शकत नाही, प्रतिकार करू शकत नाही. माय बहिणी जीवंतपणे चितेवर काठ्यांनी ठोसून जाळतोय किंवा त्यांचा खून करतोय दिशाहीन झालेला हा समाज स्त्रीला स्वतंत्र व्यक्तीत्व नाहीच हा पक्का समज करून बसलेला आहे पण "स्त्री स्वातंत्र्याच्या श्रेष्ठ ध्येयाच्या दृष्टीने "सती" हा कोणत्याही स्वरूपात अधर्मच ठरतो, मृतपतीवर अलोट प्रेम असणारी स्त्री विरक्त होईल, फार तर पुनर्विवाह करून पुन्हा संसार थाटणार नाही पण तिला अनेक सामाजिक कर्तव्य उरतात ती कर्तव्ये करीत पतिवरील व कुटुंबातील इतरांवरील प्रेमाचा विकास करून ती विश्व कुटुंबाची सेवा करण्यात आनंद मानील. हाच खरा सती धर्म असून शरीर जाळून घेणे हा खरा धर्म नव्हे."[४] असे मत निर्भिडपणे सनातन्यांची पर्वा न करता मांडले. व इंग्रजसरकारने या मताला साथ दिली आणि इ. स. १८२९ साली लॉर्ड बेंटिंगने सतीची चाल कायद्याने बंद केली. या सुधारणेमुळे स्त्रियांकडे बघण्याची एक नवी दृष्टी प्राप्त झाली. स्त्री सुधारणेची, स्त्रीला माणूस म्हणून जगण्याचा पूर्ण अधिकार आहे या विचारसरणीची प्रचंड [illegible] लाट उठली आणि तिचे साद-पडसाद संबंध भारतभर पसरले आणि त्या ओघानेच हिंदूधर्मात झालेला विलक्षण कर्मठपणा समूळ नष्ट करण्यासाठी पंजाबमध्ये स्वामीदयानंद सरस्वती यांनी आर्यसमाजाची स्थापना केली आणि हिंदूसमाजातील रूढ क्रूर चालीरितीवर, सदोषवृत्तीवर हल्ला करायला सुरवात केली. तर महाराष्ट्रातही डॉ. आत्माराम पांडूरंग यांनी ३१ मार्च १८६७ साली प्रार्थना समाजाची स्थापना केली. या वातावरणाला पोषक ठरणारे लिखाण बाळशास्त्री जांभेकर, लोकहितवादी, विष्णूबुवा ब्रम्हचारी, महात्मा जोतिराव फुले, आगरकर, रानडे, भांडारकर, आदि समाजसुधारकांनी केले स्त्रियांना रूढीच्या बंधनातून मुक्त करण्याचा प्रयत्न आपल्या लेखणीतून केला, व धर्मातील पावित्र्य आणि शुध्द विचार बाजूला ठेवून कर्मकांण्ड आणि कर्मठपणात झाकून, गंजून गेलेली धर्माच्या आड लपलेली आपली संस्कृति पुन्हा एकदा शुध्दतत्वावर, कालाच्या गरजेनुसार नव्यादृष्टिकोनातून, नव्या मूल्यावर उभी करायचा वसा घेतला.

बंगालमध्ये असलेल्या सतीच्या प्रथे इतकी महाराष्ट्रात ही प्रथा प्रचलित नसलीतर पेशवेकालात रमाबाई पेशवे सती गेल्याचे उदाहरण आहेच. महाराष्ट्रातील स्त्री जीवन प्रामुख्याने बालविवाह, केशवपन, बाला-जरठ - विवाह, पुनर्विवाहाला असलेली बंदी या रूढी, परंपरेखाली दबून गेल्या होत्या. व या रूढीने स्त्रियांच्या व्यक्तिमत्वाची लक्तरे केली होती. जिला स्वत:चे जीवन स्वत:च्या मर्जीने जगण्याचा अधिकार नव्हता तिथे, सामाजिक, धार्मिक, सांस्कृतिक जीवनात तिचे स्थान नगण्यच होते. आणि त्यामुळे आपले सर्वांगिण जीवन रसातळाला गेले होते व गुलामगिरी, दास्यत्व, पारतंत्र्याच्या बेडया शतकानुशतके आपल्या पायात अडकलेल्या होत्या. ज्या समाजातील स्त्री सुशिक्षित, सुसंस्कारित, सूज्ञ असेल तो समाज निश्चितच वैभव संपन्न असणार पण सुसंस्कृतिच्या शिल्पकारालाच आपण अज्ञानाच्या अंधारकोठडीत दडवून ठेवले होते. तेथे वैभवाची, सदृढ संपन्न पहाट बघायला कशी मिळणार? या प्रेरणेतूनच महाराष्ट्रातही सुधारणेची पावले उचलली जाऊ लागली.

ही स्त्रियांची दुर्दशा कदाचित ईश्वरालाही अमान्य होती म्हणूनच पाश्चात्यांच्या स-हदय व उदात्त भूतदयावादी, व मानवतावादी राज्यकर्त्यांना त्यांनी इथे पाठविले होते. व स्त्रीयांना या परवशतेच्या मूक आक्रोशातून परत एकदा हात देऊन उठविण्याचा प्रयत्न चालू झाला होता. नव्या युगातील पहाटेच्या विचारांचा हा सूर्य किरण महाराष्ट्रातही त्याचे जीवन प्रकाशमय करण्यासाठी उगवला होता.

नवीन कल्पनांची सुरवात:-

व्यक्ती, कुटूंब हे समाजाचे अंग आहे तर स्त्री आणि पुरूष हे दोन घटक आहेत. या दोघांच्या समन्वयावर समाजाची सांस्कृतिक, धार्मिक, राजकीय उभारणी अवलंबून आहे. सुसंस्कृत समाजाची जडण-घडण या दोन्ही घटकांनी करावयाची असते. तरीही त्यांचे कर्तव्याचे आणि कर्तृत्वाचे क्षेत्र भिन्न असल्यामुळे, त्यांचा व्यक्तीगत विचार करणे भाग पडते. पुरूषप्रधान संस्कृतिचे वर्चस्व आपल्या समाजरचनेत असल्यामुळे, स्त्रीला पर्यायाने दुय्यम स्थान प्राप्त झाले.

पण सामाजिक उन्नति आणि अवनतिचा विचार केला जातो तेंव्हा मात्र प्रथम स्त्रीला जबाबदार धरले जाते. कुटूंबाची सुस्थिती ही स्त्रीवर अवलंबून, असल्यामुळे कुटूंबातील रितीरिवाज, संस्कार, नितिमत्ता, धर्माचरण इ. सुस्कांरांचे शिक्षण देणारी स्त्रीच असते. असा कुटूंबातला संस्कारीत घटक जेंव्हा बाहेरच्या सामाजिक विश्वात पदार्पण करतो तेव्हा तो समाजजीवनाचा अविभाज्य घटक ठरतो. कारण संस्कृतिनितीमत्ता हा व्यक्तीगत मनोधर्माचा भाग असला तरी त्याचा चांगला वाईट परिणाम समाज जीवनावर होतोच. मग समाजजीवनाच्या जडण घडणीत नितीमत्ता जोपासणारी एक प्रमुख घटक स्त्री आहे. तिचेच व्यक्तीस्वातंत्र्य तिथे हिरावून घेऊन तिच्याकडे फक्त उपभोगाची वस्तू, पायाची दासी, बटिक या दृष्टीने बघीतले गेले तर अनर्थ निश्चीतच ठरलेला आहे. यात वादच नाही. आणि नेमके धर्माच्या नावावर रूढी परंपरेची घातलेली जीर्ण वस्त्रे आता कालबाह्य ठरली होती. नव्या ज्ञानाची व ख-या धर्माच्या आचरणाची वस्त्र परीधान करण्याची काळाची गरज सुधारकांना वाटू लागली होती; त्या मार्गाने त्यांनी त्याची वीण घालण्यास प्रारंभ केला.

बुध्दीनिष्ठ आणि तर्कसुसंगत, दूरगामी परिणामांच्या विचारातूनच स्त्रीला दास्यातून मुक्त करावे, तिचे अधिकार तिला परत द्यावेत आणि एक संपन्न समाजाची उभारणी करावी असे ध्येय या नव्या विचारांनी प्रेरीत झालेल्या सुधारकांचे होते. या विचारांच्या प्रसाराचे माध्यम होते १९ व्या शतकातील नियतकालिके.

व्यक्तीत्वाला, व्यक्तीस्वातंत्र्याला, मानवीमूल्यांना जोपासूनही पाश्चात्यांनी जी भारतीयांच्या दृष्टीने चमत्कारीक बुध्दीनिष्ठ भौतीक प्रगती साधली होती. तिच्यात कुठेही धर्माचे अवास्तव अवडंबर नव्हते. स्त्री शुद्र असा भेदभाव नव्हता, त्यांची व्यक्तीगत प्रतिष्ठा कुठेही कमी दर्जाची नव्हती. आपण धर्मप्रमाणे जातिभेद मानतो, स्त्रीला स्वातंत्र्य देत नाही, स्त्री प्रगतीच्या मार्गातील अडसर समजतो धर्मनियमा प्रमाणे स्त्रिचा जीवंत बळी देतो. पूजाअर्चा, सोवळे ओवळे, दान दक्षिणा, सर्व धार्मिक विधी करतो तरी

तरी आपण परतंत्र का? त्यांचा धर्म श्रेष्ठ की आपला? आपल्या धर्मात सांगितलेले खरे तत्वज्ञान काय? आपण त्याला खोटे पणाचा मुखवटा का चढवला? आणि तो ओरबाडून काढून पुन्हा आता खरी नीतिमत्ता जी ईश्वराला मान्य आहे तीच्ची प्रस्थापित होईल असा तर्कशुध्द विचार लोक करू लागले.

ब्रिटिश अमंलाखाली पडिल्याने लोक जरासे दिपून जाऊन त्यांच्या सुधारणांनी प्रभावित झाले होते, भारावून गेले होते. प्रगती पथावर त्यांची पावले पडू लागली होती. त्याला स्त्रियांची जागृतीही अपवाद नव्हती.

महाराष्ट्रांत प्रचलित असलेल्या अधर्मी प्रथांनी सुध्दा बंगालमधील स्त्रियांसारखीच महाराष्ट्रीय स्त्रियांची दुर्दशा झाली होती. त्या प्रचलित प्रथा. लहान वयात अगदी पाळण्यात सुध्दा मुलामुलीचे लग्न लावायची, मृत्यूच्या हाके पर्यंत म्हाता-याने अल्पवयीन मुलीशी लग्न लावायचे, पतीची व पतिसुखाची सुतराम कल्पना नसतांनाही विधवा स्त्रीने परपुरुषातमोर बसून स्वत:चे सौंदर्य विद्रूप करून टाकायचे, डोक्यावरल्या केसांचे मूंडण करायचे. व वासनाविकारापासून दूर राहून मरण येई पर्यंत जीवंत मरण भोगायचे, किंवा पतीच्या मृतदेहाबरोबरच स्वत:ला जाळून घ्यायचे, तिने पतिनिधना नंतर संपूर्णपणे व्रतस्थ राहयचे, चार भिंतीत स्वत:ला कोंडून घेऊन स्वत:च्या भावना करपून टाकायच्या, असे जर ती वागली नाही तर धर्मात कठोर शिक्षा आहेच, व्यभिचारीणी, पतिता म्हणून तिची मानहानी व अवहेलना ठरलेली आहेच, देवाला वाहील्या म्हणून मुरळ्यांचे लग्न, देवाशी लावायचे आणि तथाकथित प्रतिष्ठीत समजल्या जाणा-या माणसांनी त्यांच्या शीलावा चोळामोळा करण्याचा अधिकार बिनधास्त बजवायचा. ही सगळी अमानुष कृत्ये राजरोसपणे धर्माच्या नावावर केली जात आहेत हे लक्षात येताच सुधारकांची मने कळवळून उठली आणि त्यांनी या अनिष्ठ प्रथांविरुध्द सतत झोंड उठवली. धर्माच्या धोतांडाला चिकटून बसलेला स्वार्थी वर्ग या विचारांना पाखंडी, धर्मभ्रष्ट समजू लागला व वस्तुस्थितीवर पांघरूण घालण्याचा दुबळा प्रयत्न सुरु झाला. अज्ञानी समाजाला शिक्षण देऊन जागृत करण्याचे कार्य ब्रिटिशांनी सुरु केले तसेच स्त्रियानांही

शिक्षण घेण्याची सवलत मिळवून दिली. व तिला सज्ञान करण्याचे ठरविले.

महात्मा जोतिराव फुल्यांनी, बाळशास्त्री जांभेकर, लोकहितवादी यांची उदात्त कल्पना प्रत्यक्षांत राबवली आणि नव्यादृष्टी कोनात स्त्री जीवनाचा विचार होऊ लागला व तिच्यावरील अन्यायाचे सावट दूर होईल अशी अपेक्षा निर्माण झाली. तर्कशुध्द विचार समाजापर्यंत सातत्याने पोहचवण्याचे माध्यम आपल्या हाती आले. पाश्चात्यांनी इथे केलेल्या अनेक भौतिक सुधारणामध्ये मुद्रणकला इथे आणली. वृत्तपत्राचा जन्म झाला आणि समाज जागृतीचे चालते बोलते माध्यम आपणास सापडले. ज्ञानाच्या वाटा बंद करू नका, विद्याविचार खंडीत करू नका, मिळेल त्या मार्गाने ज्ञानाचा स्विकार करा, आत्मपरीक्षण करायला शिका, दुराचारी विचारांपासून परावृत्त व्हा, स्त्रियांना पुनर्विवाहास बंदी घालणे म्हणजे सामाजिक अधोगतीला वाव देणे, तिची अंधश्रध्दा वृत्ती घालवण्यासाठी तिला शिक्षण आवश्यक आहे ते तिला द्या. बालविवाहाची अनिष्ठ प्रथा बंद करावी लहानपणी मुलीचे लग्न करायचे म्हणजे किती लहानपणी करायचे? त्याची वयोमर्यादा निश्चित करा असे जांभेकरांनी कळकळीने समाजाला "दर्पण" वृत्तपत्रातून आवाहन केले. मी समाजाला हात जोडून सांगतो, विनंती करतो, ही बालविवाहाची प्रथा बंद करा, बायकांची बुध्दी वाईट मार्गाने धावते, व्रत, वैकल्ये यांचे बरोबर अंध:श्रध्देत ती गुरफटली कारण तिचा वावरच मर्यादित क्षेत्रात आहे. स्त्रियांच्या अधोगतीस समाज जबाबदार आहे तर समाजाच्या अधोगतीस स्त्रीचे अज्ञान. " ईश्वराने स्त्री पुरुष सारखे उत्पन्न केले व उभयतांचे अधिकार समसमान आहेत." [५] असे समतावादी विचार इथे लोकहितवादींनी प्रभाकर या वृत्तपत्रातून प्रस्थापित केले. इथे आईवडीलच आपल्या मुलीचे खाटीक बनतात. कच्छ देशात मुली मारून टाकतात तर महाराष्ट्रात उभा जन्म स्त्रियांना क्षणोक्षणी मरणांतिक यातना भोगून घालवावा लागतो.

अल्प वयात लग्न आणि आजन्म विधवा राहणे या दुष्ट चाली मोडल्या खेरीज कांही एक सुधारणा व्हायची नाही अशा नव्या मतांची स्त्रीच्या व्यक्ती स्वातंत्र्याच्या व व्यक्तीविकासाच्या दृष्टीकोनातून रुजवात व्हायला

सुरवात झाली. आणि महाराष्ट्रात स्त्री स्वातंत्र्याची चळवळ जोमाने सुरु झाली.

ज्ञानप्रसार आणि ज्ञानवाहकाचे कार्य नियतकालिकांच्या माध्यमातून होऊ लागले. नव्या दृष्टीकोनात तर्क शुध्दता आणि बुध्दीनिष्ठता आहे असा आत्मविश्वास या सुधारकांना आला होता. दर्पण, प्रभाकर, ज्ञानोदय, ज्ञानप्रसारक आणि अशाच अनेक नियतकालिकांमधून समाज प्रबोधनाचे कार्य सुरु झाले. सुशिक्षित होऊ लागलेल्या समाजात चिकित्सक बुध्दी वाढवण्याचा प्रयत्न करून समाजातील विचारस्वातंत्र्याची भावना वाढीला लावण्याचा प्रयत्न या नियतकालिकांमधून झालाच, आणि सांस्कृतिक परिवर्तनाच्या, काळातील हे दिशादर्शक ठरले. या सर्व वातावरणाचा प्रभावी परिणाम विविधज्ञान विस्तार या वृत्तपत्रावर पण झाला. वरील सर्व विवेचनावरून महाराष्ट्रातील स्त्री जीवन ही कारुण्यपूर्ण होते. हे स्पष्ट होते. कोणालाही तिच्या विषयी दया वाटावी इतके तिचे जीवन दुःखानी व्याप्त झाले होते. आणि त्याचे प्रतिबिंब तत्कालीन नियतकालीकातून दिसून येत होते. विविधज्ञान विस्तारातून जे लेख प्रसिध्द झाले त्यातूनही स्त्रीजीवनाचे चित्र रेखाटले गेले आहे. म्हणूनच त्या लेखांच्या अनुशंघाने तत्कालीन स्त्री जीवनाचा आढावा घ्यावयाचा आहे. तत्पूर्वी विविधज्ञान विस्ताराची प्रेरणा आणि स्वरूपकाय होते हे ही बघणे आवश्यक आहे.

विविधज्ञान विस्ताराची प्रेरणा, स्वरूप, उद्दिष्ट :-

समाजात कुठल्याही प्रकारचे प्रबोधन साकार होण्यासाठी थोडा कालावधी जावा लागतो. सातत्याने जाणीवपूर्वक त्या विचारांचा पाठपुरावा करावा लागतो. तेंव्हा कुठे समाजमनात त्या विचारांविषयी आस्था गांभीर्य निर्माण होऊन त्यातील तथ्य आणि सत्य लोकांना समजते, पटते. १८१८ ते १८६७ हा कालखंड महाराष्ट्रात वैचारिक मतपरिवर्तनाची सुरुवात करण्यात गेला. नव्या विचारांचे नैतिक, सामाजिक, सांस्कृतिक आणि धार्मिक मोल आणि प्रबोधनाची गरज पटवून देण्यात गेला. या कालातील साहित्याची

निर्मिती ही जाणीवपूर्वक होत होती. नवे तत्वज्ञान नवीन आचार- विचारांनी समाज सुधारणेचा कल वाढवावयाचा होता. १८६७ पर्यंत निघालेल्या नियतकालीकातून स्त्री जीवनाचा विचार विविध अंगानी केला गेला व तिच्या समस्याचे अवलोकन केले. वैचारिक आकलनाच्या कक्षा वाढवून सामाजिक व धार्मिक प्रबोधनाला सुरवात झाली होती. अनेक क्षेत्रातल्या आपल्या संकुचित, कलुषित, कालबाह्य ठरू पाहणाऱ्या क्षेत्रात परिवर्तनाचे विचार मूळ धरू लागले होते आणि या सर्व सुधारणेचा केंद्रबिंदू होता "स्त्री" सुधारणा. १८६७ साली ज्ञानप्रसारक बंद पडले आणि त्याच वर्षी जुलै मध्ये विविधज्ञान विस्ताराचा जन्म झाला, तो स्त्रीच्या उत्थापनेच्या उदात्त प्रेरणेतूनच. कुलस्त्रियांच्या पुनरुध्दाराचे उदिष्ट डोळ्यापुढे ठेवूनच.

विविधज्ञान विस्ताराचा संकल्प:-

देशभर सुरू असलेल्या समाज प्रबोधनाचे कार्य पुढे त्याच उत्साहाने नेटाने चालू ठेवण्याचे काम विविधज्ञान विस्ताराने हाती घेतले. त्यात प्रामुख्याने "स्त्री" जीवनाच्या अवनतीला कारणभूत ठरलेल्या जाचक बंधनावर कोरडे ओढले आणि स्त्रीयांच्या सर्वांगिण विकासासाठी आवश्यक त्या उपाय योजनाही आखल्या. तत्कालीन समाज दर्शनाचा विविधज्ञान विस्तार आरसा बनले. "कुलस्त्रिया आणि सद्गृहस्थ" यांच्या साठी ज्ञानार्जन करण्याचा संकल्प रा. भी. गुंजीकरांनी केला आणि अव्याहत जवळजवळ सत्तर वर्षे [illegible] हे कार्य नेटाने व सचोटीने केले. लोकांची आकलन शक्ती, अभिरुची, अवलोकन करण्याची शक्ती वाढवण्याचा प्रयत्न केला आजपर्यंत समाजात समाजसुधारकांनी ब्राम्हणी आराजकता, त्यांची पिळवणूक करण्याची क्रूर पध्दती जातिभेदामुळे बहुजन समाजातील समाज मनात निर्माण झालेली जीवनाची निराशा, उच्चभ्रू समाजातील विकृती, स्वदेश प्रेमाचा अंतर्मनात असलेला अभाव, अशा अनेक प्रकारच्या प्रबोधना बरोबर प्रामुख्याने स्त्री जीवनाविषयी निर्माण झालेल्या आस्थेपोटी, स्त्री सुधारणेच्या गरजेपोटी, स्त्रियांच्या प्रश्नांचा पाठपुरावा सातत्याने केला. सातत्याने एकाच विषयाचा विचार करून, त्या विषयाची भावगर्भितता समाज मनात निर्माण होते आणि मग त्या विषयातील सत्याचा

एक साचा तयार होतो आणि हा साचा परिपक्व झाला की भावना आणि वैचारिकता यांची सांगड घातले व तिच बुध्दीनिष्ठा समाजात पेरली जाते. लोकहितवादी, बाळशास्त्री जांभेकर, विष्णूबुवा ब्रम्हचारी, यांनी स्त्री सुधारणेची भावगर्भिता वैचारिक बैठकीतून व दूरदृष्टीने समाजमनात पेरली होती तर समाजातील प्रगतीला अडसर झालेल्या खोटया प्रतिष्ठीतपणाचा बुरखा घालून अराजकता माजवणाऱ्या कांही मूठभर समाजाविरुध्द दंड थोपटून त्यांची पर्वा न करता, महात्मा फुल्यांनी स्त्री शिक्षणाचा पाया घालून स्त्री मुक्तीचा पाया वैचारिक बैठकीवर भक्कमपणे उभा केला होता. आणि याच विचारांच्या अनुरोधाने विविध ज्ञान विस्तारातून स्त्री विषयक सुधारणेचे उलटसुलट प्रतिक्रिया व्यक्त करणारे लेख प्रसिध्द झाले. स्त्री जीवना त होऊ लागलेल्या स्थित्यंतराने लोक भांबावले आणि भारावलेही. या लेखा वरूनच प्रबोधन कालाची सुरूवात झाल्यापासून समाजमनावर त्याचा किती प्रभाव पडला व स्त्री जीवनाचे स्वरूप ख-या अर्थाने बदलले का हे आजमावयाचे आहे. प्रस्तुत प्रकरणांत "स्त्री जीवनाचे विविधज्ञान विस्तारात प्रतिबिंबीत झालेले चित्र बघायचे आहे. आत्ता पर्यंत १९ व्या शतकातील एकंदर स्त्रीजीवनाचा आढावा थोडक्यांत घेतला आहे. तो घेणे क्रमप्राप्त होते. कारण कुठल्याही सुधारणेची पूर्वपिठीका भक्कम असल्याशिवाय ती सुधारणा अगदी नेटाने, निश्चयाने, समर्थपणे पुढचे पाऊल टाकूच शकत नाही. व त्याचे स्वरूप निश्चीत होत नाही. विविधज्ञान विस्ताराचा संकल्पही स्त्रीसुधारणा हाच होता. त्याच्या प्रेरणा, स्वरूप, आणि उद्दिष्टातच संपादकांनी आपली प्रतिज्ञा पहिल्याच अंकात स्पष्ट केलीय ती अशी.--

१) "विविधज्ञान विस्ताराची प्रेरणा, विद्यावृध्दी सरकार व रयत यांच्या संबंधाने सुमारे सत्तरालक्ष रुपये खर्च होऊन सत्तर हजार विद्यार्थ्यास विद्यामृताचा लाभ, त्यांच्या कल्याणार्थ व विश्रांतीस्तव मासिकाचे नियतकालिकाचे प्रयोजन.

२) एकाच विषयावर का होईना परंतू अनेक मते पाहून त्यातील तथ्य शोधून काढण्यास वाचकांच्या बुध्दीस स्फुरण येते व वाचनाची खरी

गोडी लागण्यास अशा पुस्तका वाचून दुसरे साधन मिळणे कठीण

३) चांगले काव्यादिग्रंथ रचणा-या विद्यापरायणांची देशहितार्थ सुमतिपर अनेक प्रकारचे पद्यात्मक ग्रंथ रचले आहेत. पण त्यातील सौंदर्य टिपण्याची गोडी नाही आसे का? भाषेचा वीट मग त्यातील सुनीतिकडे कोण बघतो.

सांप्रत काळास लक्षून चांगल्या रीतिभाती युक्त अशा नीतिवादाचे व व्यावहारिक गद्यात्मक भाषा सुधारून लोकांच्या ठायी तिची सद्भिरुचि प्राप्त करून देण्यास यत्न करणारे विविधज्ञान विस्तार नामे पुस्तक प्रतिमासास एक वेळ काढणार.

४) लोककल्याणाची कृत्ये त्यात येणारे विषय, शास्त्रीय विषय स्त्रियांच्या उपयोगास्तव मनोरंजक असून सन्मार्गवर्ती अशा गोष्टी, रूपके, कविता विद्यार्थ्यांच्या उपयोगास्तव अन्य भाषेतून घेतलेली भाषांतरे इतिहास, देशज्ञान, विख्यात पुरुषांची आजन्म चरित्रे, शरीरसंपत्ती रक्षणार्थ उत्तम वैद्यकाच्या आधारे घेतलेले नियम नवीन जाहलेल्या पुस्तकांचे गुणावगुण, विवेचन, नित्यव्यवहारा संबंधी नीतिवादाचे निबंध इत्यादिनेक विषयांचा संग्रह करणार आहोत. आणि राणे व रंक, पुरुष, व स्त्रिया, लहान व थोर यातून कोणाच्याही हे हाती लागले असता, ते आपल्या संग्रही असावे अशी पूज्य बुध्दी त्यांच्या ठायी उत्पन्न करण्याचा निश्चय केला आहे. ह्या निश्चयाचे स्वरूप सांगतांना संपादकाने स्पष्ट म्हटले आहे की, " सांप्रत अशा मासिक पुस्तकाची आपल्या लोकास आणि विशेष करून स्त्रियांस किती आवश्यकता आहे हे सिध्द करण्यास जितका आनंद होतो तितकाच, मुंबई इलाख्यासारखा, विस्तीर्ण व भरगच्च वस्तीच्या प्रदेशांत, विद्यावृध्दीकडे सालीना सरकार व रयत यांच्या संबंधाने सुमारे सतरालक्ष रुपये खर्च होऊन, सरासरी सत्तर हजार विद्यार्थ्यास विद्यामृत प्राप्त होत असता, त्यांच्याच कल्याणार्थ व विश्रांतीस्तव अशे एखादेही मासिक पुस्तक नसल्याने, विषादही प्राप्त होतो." [६] पहिल्या अंकाच्या सुरवातीलाच स्त्रियां-

च्यासाठी स्त्रीजागृतीसाठी आवश्यक असणारी सामाजिक स्थिती निर्माण करणे हा मुख्य उद्देश होता असे म्हणल्यास गैर होणार नाही. त्यादृष्टीने नव्या विचारांचे नैतिक, सामाजिक, सांस्कृतिक धार्मिक मत प्रसारणाचे कार्य या नियतकालिकाने केले. पतित स्त्रीचा उध्दार, स्त्रियांच्या पनर्विवाहासंबंधी अनुकूल प्रतिकूल मतांची चर्चा, विधवा स्त्रियांची समाजाकडून होणारी अवहेलना, पतित समाजाचे व पतित विधवांचे प्रश्न, हिंदूधर्माने विधवांवर लादलेले अधर्मी नियम, बालविवाहाची गंभीर समस्या, स्त्रिशिक्षण, स्त्री आणि समाजावर होणारे त्याचे परिणाम, स्त्रीचे वैवाहिक जीवन, स्त्रीच्या संवेदनेशी एकरूप होऊ पहाणारे नवे विचार, तर स्त्रीच्या दु:खाकडे माणूस म्हणून न बघता परंपरावादी वृत्तीने बघणारे कठोर विचार वेश्यांचा प्रश्न, स्त्रियांचे अधिकार आणि कर्तव्य, या सर्व दृष्टीकोनातून विविधज्ञान विस्तारात जे स्त्रीजीवन चित्रीत झाले आहे. त्यावरून स्त्रियांच्या पुनरुत्थापनातील प्रयत्नाचे स्वरूप कसे होते हे अभ्यासाचे आहे व स्त्रीजीवनाची रूपरेखा बघावयाची आहे.

विविधज्ञान विस्ताराचे बाहयांगरूप:-

विविधज्ञान विस्तारातील लेखांचा अभ्यास करण्यापूर्वी त्याचे बाहय रूप कसे होते हे बघणे आवश्यक आहे. विविधज्ञान विस्तार १८६७ साली जुलैत सुरू झाले. याचे संपादक होते रामचंद्र भिकाजी गुंजीकर. मासिकाचा आकार डेमी साईज, मुखपृष्ठ पिवळ्या, निळ्या किंवा तपकिरी पातळ कागदाचे, मध्यंतरी महाराष्ट्र साहित्यपत्रिका विविधज्ञान विस्तारातून छापली गेली तेंव्हा मासिकाचा आकार क्राऊन साईज झाला. व तो १९३७ पर्यंत तसाच राहिला. **A Monthly Magazine of Marathi Literature for Ladies & Gentlemen.** व त्या खालीच

" कुलस्त्रिया व गृहस्थ या करिता"

असे छापलेले आहे. गणपत कृष्णाजी यांच्या छापखान्यात, कान्होबा गणपतराव

यांचे एक्झिक्यूटर रावसाहेब विश्वनाथ नारायण मंडलिक व गोविंद गंगाधर फडके यांनी छापले. रामचंद्र निळकंठ मोघे यांनी ते प्रसिध्द केले. पहिला अंक १६ पृष्ठांचा होता. १८६७ ते १८७४ आठवर्षे हे अंक जुलै ते जुलै निघाले. व १८७५ पासून जानेवारी ते डिसेंबर असे अंक निघू लागले ते १९४७ पर्यंत. " समाज जीवनाची स्पंदने आणि त्यांच्या दु:खभरल्या जगण्यावर विविध उपाययोजनांनी फुंकर घालण्यात विस्ताराने मोलाचा वाटा उचललेला दिसतो." समाजजीवनातील या दु:खभरल्या स्पंदनाच्यावर हळूवार फुंकर घालून तिला उत्फुल्ल करण्याचे जाणीवपूर्वक स्विकारलेले हे कार्य ऋषीतुल्य कार्य होते. आणि म्हणून यात प्रसिध्द झालेल्या लेखांनवरून तत्कालीन स्त्री जीवनाचे चित्र कसे होते हे बघता येईल. माणसाच्या जीवितावी साक्ष जसे -हृदयाचे स्पंदन आहे तद्वत १९व्या शतकातील समाजमनाच्या स्थितीगतीचे जीवंत स्पंदन आहेत. नियत कालिके त्यात शिरोमणी ठरलेल्या विविधज्ञान विस्तारातून स्त्री जीवन बघावयाचे आहे.

"विविधज्ञान विस्तारातील स्त्री विषयक लेखांचा आढावा":-

विशेष करून स्त्रियांसाठी या मासिकाची आवश्यकता आहे या उद्देशानी प्रेरीत झालेले हे नियतकालिक समाजमनाचे स्त्रीकडे बघण्याचे दृष्टीकोन निर्भीडपणे स्पष्ट करते. साहित्यिक, वैचारिक लेख, चरित्र, आत्मचरित्रपर लिखाण, गृहिणीरत्नमाला, पंचरत्नमाला, समाजचित्र, स्त्रीजीवनावर प्रकाश इत्यादि लेखातून स्त्रीजीवन स्पष्ट करून त्यांच्यात कुतूहलाने, विचाराने, बुध्दीने जागृत आवस्था आणण्याचा प्रयत्न लेखकांनी केला आहे. स्त्रियांच्या सर्वांगिण प्रश्नाला स्पर्श करून जाणारे वाङ्मय या नियतकालिकात समाविष्ट झालेले असल्यामुळे तत्कालीक सामाजिक स्थितीचा तो आरसा आहे स्त्रीमुक्तीच्या विचाराची सुरवात होऊन ३०-४० वर्ष झाली होती. त्यादृष्टीने सुधारकांनी सुत्रबध्द योजना आखायला सुरवात करून तीची अंमलबजावणी करायला सुरवात केली होती. स्त्री शिक्षण, स्त्रियांना आर्थिक स्वातंत्र्य द्यावे की न द्यावे हा वाद, बालविवाहाचा ज्वलंत प्रश्न, केशवपनाची अमानुषचाल बंद करावी पुनर्विवाहाचा कायदा झाला होता पण समाज तो मानायला तयार नव्हता म्हणून विधवा विवाहांची स्थिती, स्त्रियांच्या मर्यादा, स्त्रीच्या शीलरक्षणाचा

विचार, कुटुंबातील स्त्रियांचे स्थान, सद्गुणांचे स्त्री जीवनातील स्थान स्त्री शिक्षणाचे बरेवाईट परिणाम, मुलींचे लग्न, सासुरवास स्त्रियांचे चरित्र आणि पुस्तक परीक्षा अशा विविध विषयांमधून स्त्री जीवनाचे चित्र स्पष्ट होते. समाजाची जडण घडण कशी होत होती याचे आकलन वरील लेखात होऊ शकत होते. स्त्री जीवनाच्या सर्वांगीण विकासाचा पाठपुरावा करून परिवर्तनाची दिशा आजमावली जात होती. गो. म. चिपळूणकर. वा.ना. देव, भांडारकर, पा. दा. गुणे, रां. भी. गुंजीकर, कानिटकर काशीबाई, किळे कमलाबाई या सारख्या व्यासंगी, बहुश्रुत लेखकांचे आणि लेखिकांचे लेख आहेत. तर साहित्यीक अभिरुचीची जाण वाढविणाऱ्या लक्ष्मीतनया, कुसुम सारख्या कवयित्री आहेत. कांही मान्यवर सामाजिक स्त्री कार्यकर्त्यांची चरित्रे स्त्रीयांना स्फूर्ती देऊन विचाराला चालना देणारे लेख आहेत. सुधारकी विचारांच्या प्रवाहाने जाणारे वारे स्त्री जीवनात कोणते बदल करून गेले, स्त्रीयांकडे कुठल्या दृष्टीने बघायला सुरवात झाली, हा दृष्टीकोन संकुचितच होता का उदारमतवादी विचारसरणीला जवळचा होता, सांस्कृतिक धार्मिक, सामाजिक क्षेत्रात स्त्रीला कितपत जागा होती, प्रतिष्ठा होती, याचा आलेख या लेखावरून काढता येणे शक्य आहे. "समाजात नवे घटक उदयास येऊ लागले की त्याचे नवे अनुभव व परंपरागत संस्कार, नव्या आकांक्षा आणि रूढी आचार यांच्यामध्ये विरोध उत्पन्न होतो. न्याय व नीति, हक्क व जबाबदाऱ्या, शिक्षण आणि शासन यांच्या बदलत्या नव्या कल्पना मांडल्या जातात, जुन्या संस्थांच्या फेरतपासणीची आवश्यकता भासते त्या विचारमंथनामधून नवी गृहीत कृत्ये शास्त्रज्ञाच्या प्रत्ययाला येतात आणि त्यांच्या आधारे नव्या सिध्दांताची उभारणी होते. जुन्या श्रध्दा व संस्था यांच्या मध्ये प्रतिष्ठीत वर्गाचे हितसंबंध गुंतलेले असल्याने समाजपरिवर्तनाला ते नेहमीच विरोध करतात."[९] पण या विरोधी विचारांची दखल योग्य रीतिने घेऊनच परिवर्तनाला योग्य दिशा लाभून प्रतिसाद मिळायला सुरुवात केली. स्त्री सुधारणेचा प्रश्न सुध्दा तिच्या वैयक्तिक भाव संवेदनेपेक्षा कुटुंब, समाज, राष्ट्र, आणि देशाच्या दृष्टीकोनातून सोडवणे, महत्वाचे होते. आणि म्हणून "स्त्री" व तिची गुलामगिरीतून मुक्तता ही काळाची

महत्वाची गरज ठरली व त्या दृष्टीकोनातून स्त्री जीवन पहिले जाऊ लागले.

कुटूंबातील स्त्री जीवन (कुटूंब आणि स्त्री) :-

स्त्रीच्या व्यक्तीगत कोंडमा-यामुळे तिची बुध्दी एका विशिष्ट क्षेत्रात बंद झाली होती. स्त्रीच्या जीवनाचा सर्वांगिण विचार करतांना तिची व्यक्तीगत, कौटूंबिक प्रतिष्ठा काय होती असा प्रश्न उपस्थित केला तर, रूढीच्या, परंपरेच्या नियमांनी बांधलेली ती एक मुकी गाय होती. तिचे कार्यक्षेत्र सिमित असल्यामुळे व्रतवैकल्ये आणि अंधश्रध्देच्या मार्गाने जाणे हा तिचा विरंगुळा होता. पतिप्रेमापोटी समर्पण हा तिचा सद्गुण होता, मूकपणे धर्मबंधनाच्या नावाखाली स्वत:चा मानसिक, शारिरीक होईल तो छळ सहन करणे हे तिचे कर्तव्य होते; आपल्यावर बौध्दीक, मानसिक, शारिरीक सर्व बाजूने अन्याय होतोय असे तिला वाटणे म्हणणे स्त्री धर्माचे उल्लंघन होते. याला कारण तिचे अज्ञान, अन्यायाविरूध्द ऑहसेने आणि कर्तृत्वाने प्रतिकार करता येतो व स्वत:ची आत्मप्रतिष्ठा जतन करूनही कुटूंबात सन्मानाने राहता येते. हे ती पूर्णपणे विसरून गेली होती. आपल्या पुरूष प्रधान संस्कृतीने "लहानपणापासून आपले हाती सारी सिक्का आधीन ठेवून स्त्री जातीला अगदी अंधार कोठडीत या जगापासून दूर पडद्यात नरबेत निरंतर बटकीसारखी ताबेदारीत ठेवून जेथे तेथे आपलेच गुणांचे दिवे पाजळत त्याना विद्या न कोठे जाणे येणे, गेल्यातरी तिथे त्यांच्या सारिख्याच सर्व अज्ञान, एकी सारखी दुसरी मग जास्त अज्ञान व शहाणपण त्यांना कोठून येणार."[१०] आपली व्यक्ती म्हणून कांही वेगळी अपेक्षा आहे, कुटूंबाचे घटक म्हणून कांही प्रतिष्ठा आहे. आपल्यावर अधिकार गाजवले जातात तशी आपल्या विषयी त्यांचे कांही कर्तव्य आहे. माता, पत्नी, भगिनी या पदांचे कांही वेगळेच मोल आहे ही जाणीव त्या विसरून गेल्या होत्या. व त्यांची ही कुंठीत झालेली गती योग्य मार्गाने जागृत करायची होती. स्त्री जीवनाशी संबंधीत असलेला विवाह, पुनर्विवाह, याला बालविवाहाची पध्दत व पुनर्विवाहास बंदी या धार्मिक रूढीनेस्त्रला गलितगात्र केले होते. कुटूंबाच्या विश्वातील तिचे रूप असे. घर संसार चांगला होण्याला सद्गुण आणि परमेश्वराची कृपा या गोष्टी आवश्यक

आहेत. तथापि स्त्रीचे आचरण कितीही शुध्द असून जर तिच्या भाषणामध्ये मार्द्रव नाही आणि तिला संतोष नाही आणि दिवसभर कपालाला आठ्या आणि जीभेला कर्कशभाषण याची तिला सवय आहे. तर तिच्या घरात सुख डोकावून पाहणार नाही पण तिच सद्गुणी स्त्री जर आपल्या पतिपाशी सुप्रसन्न मुखाने नि:कपट आणि मृदू भाषण करू लागली तर तो कितीही दु:खाने व श्रमाने त्रासून आलेला असला तरी त्याक्षणी त्याचे अर्धे दु:ख व श्रम नाहीतसे होऊन उभयतांमध्ये खरी प्रिती वाढेल. आणि त्यांचा संसार सोन्याचा होईल."[११] स्त्रियास उपदेश किंवा "स्त्रियांची विद्या म्हटली म्हणजे मुख्यत्वे आपल्या कुटूंबातील मनुष्याचे कल्याण होण्याची जी कृत्ये ती होत."[१२] स्त्रियांचे भूषण. स्त्रियांच्या कर्तव्याची सांगड पति आणि संसारा-शी घालून कौटूंबिक चौकटीतील तिची जबाबदारी तिचे कर्तव्य सांगून एका सुगृहिणीच्या रूपातच तिला बघीतले आहे. याप्रमाणे हे तिचे जीवन, पत्नी, खरेप्रेम, संवाद, कुटूंबव्यवस्था, समाजचित्र, बायकोभली तर नवरा भला, या लेखांतून तसेच स्त्रियास उपदेश, कुटूंबशिक्षा, या लेखातून रा. प्र. कानिटकर रा. भि. गुंजीकर, कमळाबाई किबे भा. चि. लेले इत्यादि लेखकांच्या लेखातून दिसून येते.

बालविवाह:-

कुटूंब संस्थेतील सगळ्यात महत्वाची बाब म्हणजे विवाह. दोन कुटूंबाच्या एकत्र येण्याने वाढणारी सामाजिक संस्कृति संपर्क [illegible] पण आपल्या समाजात बालविवाहाची चाल असल्यामुळे लग्न सोहळा या मंगल प्रसंगाने आनंद होण्या ऐवजी दु:ख मात्र चिंतेच्या पोटी जन्म घेते. मुलीचे लहानपणी लग्न लावून तिच्या ऋणातून मुक्त होऊन लग्न विधी लवकर पार पाडून आपली नैतिक जबाबदारीतून सुटका करून घेणे हा एकच उद्देश्य लग्नाचा असे. मग त्यात मुलगा किती वयाचा आहे हे बघणे गरजेचे वाटत नसे. मुल मुली लहान असली तर नियतीमुळे जर त्या बालीकेला अकाली वैधव्य प्राप्त झाले तर तिचे हाल विचारायलाच नको. किंवा पूर्ण शारिरीक विकास होण्याच्या पूर्वीच तिला प्राप्त होणारे मातृपद तिचा विकास खुंटवून टाक-

णारे ठरत होते. पण या प्रचलित रूढीतील या सगळ्या अनिष्ठ परिणामांबद्दे जाणून बुजून दुर्लक्ष होत होते. भातुकली मांडून खेळखेळायचे ज्या बालीकेचे दिवस त्यांना लग्नसोहळ्याच्या दडपणाखाली विवाहित होऊन गृहास्थाश्रम स्विकारावा लागे. बालवयातच अपरिपक्व अजाण असतांना जनरूढीच्या बंधनामुळे हे लग्न झाले असल्यामुळे "एखादी चिमणी ससाण्याने मारावी आणि तिचे अस्ताव्यस्त पडलेले पंख दृष्टीस पडावे."[१३] अशी अवस्था तिच्या भातुकलीच्या विखुरलेल्या खेळाबद्दे बघून तिच्या माता पित्यांची व्हायची. अनोळखी विश्वात समरस होण्याची मन:स्थिती त्या बालीकेची नसतांनाही तिला अचानक या ओझ्याखाली दबून जावे लागे. जेव्हा जाणीव पक्व होते तेव्हा "नवरा न आवडला तरी मन घट्ट करून आपला संसार चालविलाच पाहिजे, सुष्टिनियमाप्रमाणे व धर्मशास्त्राप्रमाणे तिने नव-याच्या सुखदु:खाचा वाटा घेतलाच पाहिजे."[१४] हे तिच्या जीवनाचे झालेले लक्तर आईबापांनी अुघड्या डोळ्यांनी मूकपणे बघीतले पाहिजे आणि अश्राप निष्पाप बालीकेने हे भोगलेच पाहिजे हा संकेतच दृढ होऊन गेला होता. त्यामुळे जीवनातल्या सर्वश्रेष्ठ मंगल प्रसंगाला अमंगलत्व प्राप्त होत होते. मुलीचे लग्न हया लेखावरून माता-पिता आणि अजाण मुलगी यांच्या भावनांचा झालेला चोळामोळा -हदय पिळवटून टाकणारा आहे.

त्याचप्रमाणे समाजचित्र या सदरात सुणाण लेखिका कमलाबाई बिबे यांनी "बालविवाहाचा अनुभव" लिहून त्यातील कटूता, अनिष्ठ परिणाम, समाजापुढे ठेवले आहे." विमलाचा लहानपणी झालेला विवाह तिचे शैशव तिच्या पासून हिरावून घेतो. पति, पतिप्रेम, घर, या सगळ्या गोष्टी तिला अनभिज्ञ असतात, तरीही जनरीतिचे पालन करण्यासाठी आपले बालपण, प्रेमाची माणसे, मैत्रिणी, खेळ, खेळणी सर्वांचा त्याग करून तिला सासरी जावे लागते. म्हणून अंतरपाठ दूर होताच नवरा म्हणजे आपला आनंद हिरावून घेणारा दुष्ट माणूस व हया बरोबर मला पाठवणारी सर्व वडील माणसे दुष्ट स्वभावाची आहेत ही भावना त्या निष्पाप बालीकेच्या मनात घर करून बसणे साहजिकच आहे. संसाराची गोडी आणि कर्तव्याचे श्रेष्ठत्व न समजल्यामुळे

त्या बालमनाची होणारी ससेहोलपट, कुचंबणा याची जाणीवच समाजाला नव्हती. कारण रीतिरिवाजाचे पालन व्यक्तीच्या कुटूंबाच्या, समाजाच्या राष्ट्राच्या, देशाच्या, हितापेक्षा जास्त महत्वाचे मानले जात होते.

मातृत्व हे स्त्रीच्या जीवनाचे उच्चपद, आणि मातेचे वात्सल्य हीच मुलांची खरी संस्कारशाळा, माते सारखा शिक्षक नाही हे खरे असले तरी त्यासाठी माता शारिरीक, मानसिक, बौध्दीकदृष्टया परिपक्व असणे आवश्यक आहे. बालविवाहामुळे संस्कारक्षम, सदृढ अशा समाज घडणीला आपण मूकत आहोत हे लक्षात येईना. बालविवाहामूळे ती स्वत: अविकसित मनाची असते त्यात तिला अकाली मृत्यू आला तर गोष्ट वेगळी, पण तिच्या हयातीत ही ती संस्कारक्षम मुलगा घडवायला असमर्थ असते. कारण मुळात ती स्वत:च अज्ञानाने, अन्यायाने पिडलेली असते. या अनिष्ठ रूढीने आपला दिवसेंनदिवस -हास होतोय हे समाजाला सांगणारा आणखी एक लेख स्त्री जीवनाच चित्र स्पष्ट करतो. डॉ. पेची फिप्सनबाई यांनी मुंबईत बालविवाहावर दिलेल्या व्याख्यानात म्हटले आहे "माझ्या वैद्यीकय व्यवसायाच्या निमित्ताने इथली गृहीस्थती मी बघीतली. तुम्ही लोक धर्मावर श्रध्दा ठेवणारे, ईश्वरभक्ती, हा तुमचा स्थायीभाव मग तरीही बालविवाहासारखी घातकी, अनर्थकारी रूढी तुम्ही का चालू ठेवली. स्त्री पुरूष संयोग ही परस्पर प्रेमावर अवलंबून असतो."[१५] "सद्गृहस्थ हो या घातकी चालीपासून तुम्हा लोकांच्या स्त्रियांची व भावी संततीची खराबी होत आहे." "अर्थात ही लहान अर्भकावर चोरून, छपून अगर उघडपणे बलात्कार करण्याची जी तुम्हामध्ये चाल आहे ती तुमचे सर्वस्वी नुकसान करीत आहे. प्राचीनकाळी तुम्हा लोकांत जी सुधारणा झाली होती तिच्या पासून या अमानुष चालीचा स्वीकार केल्याने तुमची पिछेहाट होत आहे ते तुम्ही जाणत नाही ही चाल तुमच्या धर्मास कलंक लावणारी व तुमच्या माणूस पणास बट्टा आणणारी अशी असून सर्व सुधारलेल्या राष्ट्रांच्या दृष्टीने त्यांच्या खरोखर समजण्यात आल्यास तमच्या किर्तीस काळीमा आणणारी आहे."[१६] आणि मग फेप्सेनबाईंनी शास्त्रीय कारणे देऊन या चालीतील अनिष्ठता किती भयानक स्वरूपाची आहे हे सिध्द करून दाखविले. स्त्रीस अकाली मृत्यू येणे, त्यामुळे बालहत्येचे प्रमाण वाढते, ती शरीराने कमकुवत होते,

अल्पवयात झालेले अपत्य कनिष्ठ प्रकारचे, रोगीस्ट असण्याचा संभव असतो. "स्त्रिया म्हणजे केवळ पुरुषांच्या सुखास साधनीभूत होणारे गाई म्हशी सारखे प्राणी, त्यात स्वत:चे सुखदु:ख असे काहीच नाही, त्यांचा पुरुषांनी आपल्या सुखाकरिता पाहिजेल तसा उपयोग करावा, व असे करणे हे केवळ धर्म संमत आहे असा सार्वत्रिक समज होऊन बसला आहे."[१७] अद्यपपही स्त्रीला जनावरांच्याही खालच्या पातळीचे जीवन जगावे लागत होते, बटीक, दासी, उपभोगाचीच वस्तू म्हणून तिच्याकडे बघितले जात होते याला कारण अज्ञान होते. म्हणून बाळशास्त्री जांभेकर म्हणत की सद्विद्या प्राप्त होणे स्त्रीच्या दृष्टीने महत्वाचे आहे आधी तिला शिकवा व मग तिच्या खांद्यावर हा भार टाका. पुनर्विवाहाला असलेल्या बंदीमुळे स्त्रीजीवन फारच दु:खी होते. पुनर्विवाहाच्या बाबतीतही समाजाने अजून संमती दिली नव्हती. १८६८ साली पुनर्विवाहमंडळाची स्थापना झाली होती. १८५६ साली पुनर्विवाहाला कायदेशिर मान्यता देणारा कायदा झाला होता. १८७० साली पुनर्विवाहावर सशास्त्र की अशास्त्र या विषयावर शंकराचार्यासमोर पुणे येथे ९ दिवस वाद विवाद झाला होता. पण समाजाने पुनर्विवाहाला संमती दर्शविली नव्हती. लोकहितवादींनी याही पूर्वी या चालीवर अंत:करणाला पीळ बसेल असे प्रश्न माता पित्यांना विचारले होते. "जेव्हा तुम्ही आपले जावायाचे मरणाची खबर ऐकता आणि तुमची कन्या तर लहान अर्भक बाळाविषयी तुम्ही आपले मनात निष्ठुरपणा का आणिता आणि आपले कन्येस तुमचे तुम्हीच खाटीक का होता?"[१८] सद्गुणी स्त्रियांवर असे अन्याय होण्याची परंपराच चालत आली होती. बालविवाह व सक्तीचे वैधव्य याचा निषेध करणारे दोन लेख लिहून हिंदूस्थान सरकारकडे पाठवून या चालवर प्रतिबंध करणारा कायदा करा असे निवेदन मि. मलबारी यांनी केले होते.

सद्गुणांशी बांधीलकी:-स्त्रीचा स्थायीभाव:-

सुगृहिणी; आदर्शमाता, पतिव्रता, चांगली पत्नी, सुकन्या, गुणवती स्त्री, यांची कर्तव्ये "सुगृहिणी" मध्ये दामोदर गणेश पाधे यांनी म्हटले आहे.

"अमूल्यतम देणगी सुगृहिणी प्रभूने दिली
न दृष्टि अमिता गुणांकधि करा तिच्या आंधळी
स्मरा वितरि मान्यता सुगृहिणीपदा पोंचवी
समाज सकला स्त्रिया, तरिच मेळावी थोरवी"[१९]

स्त्रियांचे सद्गुणांचे होत असलेले अवमूल्यन व त्यामुळे तिचा होत असलेला अनादर स्पष्ट केला आहे या वरून स्त्रियांची योग्यता दाखवून दिली आहे. व तिची होणारी अवहेलना पर्यायाने स्पष्ट केली आहे. "गुणवती स्त्री" या लेखात पतिला संकटकाळी संपूर्ण साथ देणे हाच तिचा स्त्रीधर्म सांगितला. स्त्रियांचे अधिकार स्त्रियांना मिळावेत व त्यासाठी तिने जागृत व्हावे म्हणून विष्णूबुवा परशुराम शास्त्री पंडीत यांनी ५ मार्च सन १८७५ साली वाचलेला निबंध संपादित करून स्त्री जीवनावर प्रकाश झोत टाकला. प्रेम त्याग समर्पण करणारी स्त्री ख-या अर्थाने भारतीय संस्कृतितील श्रेष्ठ स्त्री मानण्याची प्रथा आणही प्रचलित होती. "खरे प्रेम" या लेखात नि:ष्काम कर्मयोग हे स्त्रीचे कर्तव्य, कुठल्याही स्थितीत पतिशी एकनिष्ठ राहणे पती असतांना आणि दुर्दैवाने वैधव्याची कु-हाड कोसळल्यावरही आपले जीवन काष्ठवत घालवणे, पति विरहाच्या अग्नीत तिने जळत राहणे, आणि या मनोव्यथेने कोमेजून जाऊन कधीतरी मृत्यूच्या आधीन होणे. तिची ही असहाय्यता कुणाच्याच नजरेत भरत नव्हती तिचे हे दु:ख पाषाणी समाजमनाला तसुभरही कंपायमान करीत नव्हते. स्त्रीची शारीरीक जडणघडण नाजूक असते. संकटाला समर्थपणे सामोरे जाण्याचे धाडसच तिच्यात नाही. महत्वाकांक्षीवृत्ती आणि बुध्दीच्या जोरावर फक्त पुरूषच बाहेरच्या समाजात समर्थपणे जगू शकतो. भावना प्रधान असणा-या स्त्रीचे क्षेत्र फक्त चौकटीच्या आतच सिमित असणे बरोबर आहे. शास्त्रीय विषयाचे शोध लावणे, द्रव्य मिळवणे, आत्मानात्मविचार करणे, अनेक घटनांची उलाढाल करणे फक्त पुरूषानाच जमू शकते. त्यामुळे पत्नी सुख किंवा पत्नी विरह त्याला फारसा दाहक वाटत नाही. सुखकरही वाटत नाही. एका पत्नीच्या मृत्यूची जागा दुस-यांदा विवाह करून तो भरू शकतो पण स्त्री मात्र तसे करू शकत नाही. कारण जनरीत व जनरितीतील आधार धर्म. आपत काळाच्या

9681
A

दु:खांधकारात तिच्या प्रेमाच्या ज्योतिची आवश्यकता असते पण दुर्दैवाने ती जर अंध:कारात लोटली गेली तर तिचे नशीबच तसे म्हणून तिला कुचलले जाते. व दु:खाच्या भयानक गर्तेत बेदरकारपणे तिला लोटले जाते. सद्वर्तन आणि सद्गुण यांचा संबंध स्त्रीच्या सद्चारित्र्याशी जोडला जावून नीतिमूल्याचे नियमन तिच्या बद्दलच पार पाडले गेले पाहिजे ही समाजाची रीत. नम्रता, मर्यादा, या सद्चारित्र्याच्या सीमा आहेत. समर्पण आणि त्याग हा तिचा अंगचा गुण यामुळे स्त्रीला वैयक्तीक सुखदु:खाची दखल घेण्याचे भानच नव्हते. "अहिल्योध्दार" ही ना. के. बेहेरे यांनी लिहिलेली कादंबरी जुने कथानक नव्या विचाराने मांडून, स्त्रीपुरुष संबंध, स्त्रीपावित्र्य, विवाहसंस्था व राजकारण या चार प्रश्नांचा सूक्ष्म विचार केला आहे. "स्त्री पावित्र्याचा प्रश्न स्त्रीच्या नैसर्गिक असाहाय्यतेचा फायदा घेऊन तिच्या माथ्यावर सर्व पापांचा डोंगर रचणारा समाजाचा अलिखित कायदा जुलमी नाही असे कोण म्हणेल."[२०] एकदा पाऊल घसरलेली स्त्री कायमची पतिता होते असे नाही." स्त्री स्वभावाला सहज अध:पाताच्या गर्तेत नेणारी विलासलालसा व संपदेच्या लखलखाट या दोन गोष्टीनी अनेक स्त्रिया फसतात व अधिकच पापाच्या गर्तेत फसतात."[२१] याला जबाबदार आहे समाज तव्दत "जर दुसरे लग्न केल्याने विधूर निंदय होत नाहीत तर विधवा निंदय कशा होतात."[२१] हा प्रश्नही त्यांनी विचारला. स्त्रियांचा पुनरुध्दार करणाऱ्या लेखात राजाराम रामकृष्ण भागवत म्हणतात "विधवेवर जसा बालविधवेवर तसा प्रौढ विधवेवरही जुलूम नको आहे."[२२] कलियुगातले स्त्री विषयक नीती नियम धर्माधिष्ठीत असून माणसाच्या स्वार्थापोटी केले गेले आहेत व अज्ञान समाजात जास्त असल्यामुळे हे नियम ईश्वर निर्मित मानून शिरोधार्य मानले आहेत. म्हणून स्त्रियांना सज्ञान करून हे नियम मोडून काढलेच पाहिजेत.

अनिष्ठ चालीरीती:-

विधवांचे पुनर्वसन करण्यासाठी सुधारक झटत होता, बालविवाहाची प्रथा बंद पाडण्यासाठी इंग्रज सरकारच्या मदतीने कायदा केला होता. यावर सनातन्यांनी टीकेची झोड उठविली होती. "विधवांचे " विवाह लावित सुटले म्हणजे आमच्या राष्ट्राची उन्नती एकदम होईल अशी भ्रांती सुधारकास केंव्हाही

पडलेली नाही." तर "सात्वीक गुणांच्या उन्नतीची राष्ट्राला आवश्यकता आहे. म्हणून त्यादृष्टीने स्त्रियांच्या समस्यांकडे बघितले जात असे मत"[२३] अंतिमसाध्य मासिक समालोचनात लेखकाने दिले आहे. डॉ. भांडारकर, रा. नीळकंठ पांडूरंग पाटणकर यांनी आणखी महत्वाच्या प्रश्नाकडे समाजाचे लक्ष वेधून घेतले. व लोकमताची विशेष जागृती करून दैवी आपत्तींनी व मानवी प्रयत्नांनी सुधारणोन्मुख झालेल्या समाजास सत्पथावर आणण्याचे प्रयत्न केले. अज्ञ मुलीचा विक्रय, आणि खंडोबाच्या विवाहित स्त्रिया उर्फ मुरळ्या उर्फ वेश्या ही संस्था ब्राह्मणांच्या संगन्मताने चालतेय, तिचे धार्मिक भावनेला वर्चस्व आहे. पण सर्वस्वी समाजहित घातक ही संस्था मोडून नष्ट करावी व सरकारने यावर उपाय योजावा. "धर्माच्या संमतीने अज्ञ अर्भकाच्या व असहाय अर्भकास राक्षसी पालकाच्या क्रूर जबडयातून उध्दरावे."[२४] असे आवाहन इंग्रज सरकारला केले. "मुरळ्यांची संस्था म्हणजे नुसत्या नीतीचा चिवडा नसून हिंदू धर्माचा उघड उपमर्द आहे. धर्माचा पवित्र झरा अशा गलिच्छ पापी रितीने विषारी बनविते म्हणजेच राष्ट्राच्या आरोग्यास जाणूनबुजून धोक्यात घालणे होय."[२५] आपली विलासी आणि भोगीवृत्ती शमवण्यासाठी स्त्रियांचा उपयोग धर्माच्या नावाखाली करणारे वेदशास्त्रसंपन्न म्हणवले जाणारा बुध्दीनिष्ठ समाज. स्त्रियांना अतिशय हीन दर्जाची वागणूक देऊन स्वत: नामानिराळा राहात होता. पुन्हा व्यभिचाराचा कलंक तिच्या माथी लावावयास तो मोकळा. धर्म आणि कायद्या पेक्षाही समाजातिल समंजसपणाने हा प्रश्न सुटण्यासारखा होता." [२६] पण आजही मुरळ्या ऐवजी देवदासी म्हणविल्या जाणाऱ्या स्त्रियांची समस्या दूर झाली नाही. या सगळ्या गोष्टी पासून तिची मुक्तता व्हावी माणूस म्हणून तिला जगता यावे म्हणून जागृत समाजाने सतत प्रयत्न चालू ठेवले होते. प्रो. कर्व्यांनी अविश्रांत श्रम घेऊन अनाथ बालिकाश्रम काढले. पंडिता रमाबाईंनी शारदा सदन स्थापन केले. तर प्रार्थनासमाजाने एक अनाथगृह सुरू केले. व सैरभैर झालेल्या उध्वस्त होणाऱ्या स्त्रियांना आहारा दिला दिलासा दिला.

जागृत महिला:-

अशाही विपन्न अवस्थेत समाजातील सनातनीयांना न जुमानता

संधीचा चांगला फायदा घेऊनकांही स्त्रियांनी आपला आत्मविकास साधून घेतला. व त्या अपेक्षित स्त्रियांच्या मार्गदर्शक ठरल्या. आनंदीबाई जोशी, प्रतिकूल परिस्थितीतही समुद्रउल्लंघन करून वैद्यकीय विद्या त्यांनी प्राप्त करून घेतली व आपण आपल्या भगिनींच्या कांही कामी पडून व समाजऋण चुकते करू अशी सद्भावना मनी धरली. पण कालाने त्यांच्यावर मात केली आणि समाजाचे ऋण मुक्त न करताच त्या निघून गेल्या. पतिप्रेम, मर्यादा, सद्शील चारित्र्य, नम्रता, देशप्रेम व बदलत्या परिस्थितीची यथार्थ जाण आनंदीबाईंच्यात होती. स्त्री शिक्षणाने बिघडेल किंवा बिघडते हे मत चुकीचे आहे हे त्यांनी स्वत:च्या चारित्र्यातून दाखवून दिले होते. कौटुंबिक चौकटीत राहणाऱ्या स्त्रियांना त्या मार्गदर्शक ठरल्या. स्त्रीचा जन्म केवळ

"स्त्रीने जन्मवरी घरात बसूनी फुंकीत जावे चुली
बेचाळीस कुळे पवित्र म्हणाणे केली तिने आपली
ज्यांना आवडेल असेल मत हे त्यांनी तुला निंदूनी
घ्यावे अज्ञानी मिळेल तितके अन्यत्व संपादुनी" २६

या ओळीतून सर्वसामान्य जीवन जगणाऱ्या स्त्रीचे पारंपारिक चित्र स्पष्ट होत या भूमिकेवर कुटूंबाची चौकट न मोडताही स्त्री उत्तुंग भरारी घेऊ शकते हे चित्रही गौरवास्पद आहे व ते सर्वसामान्य स्त्रीला मार्गदर्शक ठरणारे आहे. बहुजन समाजातील चित्र रेखाटून, मध्यमवर्गीय, समाजातील स्त्रीचं अस्तित्वही त्यात समर्पक रितीने व्यक्त केलेले दिसून येते.

तत्वज्ञ कृपाबाई सत्यनाथन ही महाराष्ट्रीयन स्त्री सुध्दा प्रतिकूल परिस्थितीशी झगडत आपले इप्सित साध्य करून घेणारी स्त्री होती. वैद्यकीय अभ्यास झेपला नाही म्हणून निराश न होता इंग्रजी भाषेचाआकलन करून घेऊन स्त्रियांच्या उन्नतीसाठी झटल्या, उटकांड येथे हॉबर्ट नामक मुलीच्या शाळेत सुपरिटेंडेंटची नोकरी केली. यवनांच्या मुलींकरता त्यांनी दुसरी शाळा सुरू केली. 'कमला आणि सगुणा' या दोन कादंबऱ्या लिहिल्या. त्या इंग्रजी भाषेत भाषांतरीतही झाल्या. भाषेवर प्रभुत्व मिळविले. "इंडियन लेडी" या टोपण नावाने त्या वृत्तपत्र व मासिकात लेख प्रसिध्द करीत पण तरीही स्वाभाविक

मर्यादाशिलपणा, विनय, नम्रता, स्तुतिविन्मुखता, भिडस्तपणा, इत्यादि स्त्री स्वभावास अत्यंत भूषण ठरणारे गुण त्यांच्या अंगी होते. पण त्यांची सखी दहीण मात्र बुरसटलेल्या विचारांची शिक्षणाविषयी अनास्था दाखविणारी, अंध-श्रध्दाळू अशी होती. "सुशिक्षित स्त्री वर्गाची उन्नती आणि अशिक्षित स्त्री वर्गाची दुर्गति, महाराष्ट्र ब्राह्मण स्त्री कृपाबाई आणि तिच्या हिंदू महाराष्ट्र देशभगिनी यामध्ये पडलेलाफरक पहिलीची सर्वमान्यता, कर्तव्यशक्ती, लेखनचातुर्य, ज्ञानसंपन्नता, सुसंस्कृतमति, शिक्षणदान चातुर्य, सार्वजनिक संस्थांत कार्यभाग करण्याची आवड, हौस आणि कृती आणि दुस-यांची कर्तृत्वहीनता अशरणता, परावलंबप्रेम पराधिनता मानसिक श्रमांची नावड, अज्ञान, धर्मवेड व वस्तुस्थिती नसमजणे, ख-या सुधारणांस आडकाठी आणणे, रूढीप्रियता, भ्रांति-भ्रम वगैरे यांची मीमांसा करून दुस-या वर्गास त्यांच्या ख-या स्थितीचा बोध करून पहिलीचे दिव्य उदाहरण दाखवून देणे हा होय"[२७] सुशिक्षित स्त्री, अज्ञानी स्त्रीचे जीवनमान, किती भयंकरदरी दोन्ही स्त्रियांच्यामध्ये आहे. हे चित्र कृपाबाई सारख्या अपवादात्मक स्त्रियांसोडून सर्वसामान्य स्त्रियांचे जीवन स्पष्ट करते. कृपाबाई सत्यनाथ प्रमाणेच महाराष्ट्रात तत्कालीन स्त्रिया पंडीता रमाबाई, रमाबाई रानडे, याही समर्थ सामाजिक कार्यकर्त्या होत्या तर काशीबाई कानिटकर, कमलाबाई किबे, यांच्या सारख्या जागृत बुध्दीजीव व साहित्याची जाण असणा-या स्त्रियाही होत्या. कमलाबाई किबेंनी इंदूरच्या साहित्यसंमेलनात बालोपयोगी साहित्य हा लेख वाचून "बालमनाचा मानस-शास्त्रीय दृष्टया अभ्यास करून त्यांच्या बुध्दीच्या विकासासाठी कुठले साहित्य निर्माण व्हावयास हवे याचा उहापोह केला तसेच "समाज चित्रातुन" सामाजिक स्थितीचे निर्भीड अवलोकन व्यक्त केले. काशीताई कानिटकरांनी कथा वाङ्मया-त भर घातली. समीक्षणात्मक लेख लिहिले तर कलकत्ता येथे भरलेल्या महिला परिषदेचे सेक्रेटरी पद रमाबाई रानडे यांनी सांभाळले व त्यात स्त्रियांच्या सम-स्या सोडवण्यासाठी महिला समिती व आर्य महिला परिषदांची स्थापना केली. प्रो. कर्व्यांनी स्थापन केलेल्या शिक्षणसंस्थेच्या प्रसारासाठी व अनुदान मिळवण्या-साठी कांही महिला इंग्रजी व मराठीतून भाषणे करीत होत्या तर बहुसंख्य

स्त्रिया ज्या अजूनही स्वत:पासून व्यक्तीगत आत्मसन्मानाला वंचित राहिल्यात त्यासाठी संगेलने भरवून संघटीतरित्या एकत्र येऊन सामर्थ्य वाढविण्याचे आव्हान देत होत्या. ही सर्व सुधारणा ज्या स्त्रियांनी शिक्षण घेऊन आपल्या ज्ञानाच्या कक्षा विस्तृत व प्रगल्भ करण्याचा ध्यास घेतला होता अशा स्त्रियांचा यात समावेश आहे. पण अशा स्त्रिया मुठभरच आहेत. अल्प शिक्षित स्त्रियांच्यात अहंगंड निर्माण झाला होता. म्हणूनच "शहरवासी स्त्रियांची मिजास वाढली आहे ती चांगली की काय? या विषयावर लेडीज आसोसिएशन पुढे केलेल्या व्याख्यानातून सन्मार्गविरुद्ध पाहणा-या कांही स्त्रियांना जागे केले आहे. संसाराचे गाडे दोन चाकावर फिरते. त्यात एक चाक द्रव्यार्जन करते. व दुस-याने त्याचा योग्य मार्गाने विनियोग करायचा असतो पण "अलिकडे अलिकडे शिक्षणाच्या निमित्याने शहरवासी स्त्रियांत विशेष करून मला वाटते मुंबईतील स्त्रियांत मिजासीचे प्राबल्य जास्त वाढले आहे."[२८] त्या नटण्या मुरडण्यात, आधुनिक पोषाख करण्यात, भोजनगृहातून भोजन आणून आळस वाढविण्यात, वेळ घालवितात. पण हे अंधानुकरण करून काल्पनिक अशक्तपणा आणून दु:खण्याच्या चोचल्याने ऐदी व मिजासखोर बनतात. अशा रितीने अल्पशिक्षित स्त्रियांचा ऐदी, शौकी, मिजासखोर स्त्रीवर्गही समाजात अस्तित्वात होता हे या लेखातून स्पष्ट होते. पांढरपेशी, मध्यमवर्गीय स्त्रीया यात जास्त आहेत. पण बहुजन स्त्रिया मात्र अजूनही अज्ञानाच्या अंध:कारात असल्यामुळे स्त्रियांवरच्या अन्यायाला जितकी पुरुषांनी सक्रिय वाचा फोडली तितकी स्त्री अजूनही गप्प होती. याला कारण होते शिक्षणाचा अभाव आणि अज्ञानाचे प्रभुत्व, प्रभाव.

स्त्री शिक्षणाची तत्कालीन परिस्थिती व स्त्री जीवन:-

स्त्री जीवनाकडे बघण्याचे समाजात आता दोन प्रवाह निर्माण झाले होते. एकाच्या मते स्त्रियांना व्यक्तीस्वातंत्र्य आणि व्यक्तीविकासाची संधी देणे अत्यंत करणेचे आहे. तर कांहींच्या मते तीजर शिक्षण घेऊन व्यक्तीविकास साधण्याचे प्रयत्न करू लागली किंवा ही संधी तिला दिली तर कौटुंबिक आणि सामाजिक जीवन विस्कळीत होईल. किंबहुना तिच्या [illegible]

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

व्यापकता म्हणजे "गृहशिक्षण ही एवढीच होती. "स्त्रिया शिकल्या की व्यक्तीत्वाची जाणीव निर्माण होणार ती निर्माण झाली की समाजाने त्यांच्यावर लादलेली बंधने कमी करण्याचा प्रश्न येणार" बंधने कमी झाली की समाजरचना शिथिल होणार."[२९] अशी भिती पुनरुज्जीवनवादी म्हणविल्या जाणाऱ्या समाजात होती. त्यामुळे स्त्री शिक्षणाचा विचार करतांना गृहसौख्य कुटूंबसंस्था यांच्या अंतर्गत मोडणारे विषय फक्त तिला शिकवावेत असे स्पष्ट मत या विचारसरणीच्या लोकांनी व्यक्त केले होते. आगरकर, फुले, न्या.रानडे यांनी मात्र स्त्री शिक्षणाविषयी उदार व विशाल दृष्टीकोनातून विचार केला होता.

विविधज्ञान विस्तारातून दिसणारे स्त्री शिक्षण विषयक धोरण:-

स्त्री ही सद्गुणांची खाण आहे. समाजाच्या जडणघडणीची शिल्पकार, सुसंस्कारीत आपत्याच्या घडणीतूनच सुदृढ समाजाची निर्मिती होते. मग अशा स्त्रियांना जी संसार सुखाची स्वामिनी, उत्तमसंस्काराची संग्राहक, समर्पण, प्रेम, त्यागाची मूर्ती, अशी स्त्री अज्ञानामुळे अनिष्ठ चालीरितिने राहू केतूंनी चंद्राला गिळावे तत्वत त्यांच्या व्यक्तीमत्वाला गिळंकृत केले आहे. त्यांना या अरिष्ठातून ज्ञान देऊन मुक्त केल्यास स्त्रीच्या व्यक्ती विकासाबरोबरच राष्ट्र आणि देशाची उन्नती सहजसाध्य होईल. वस्तुस्थितीच ज्ञान आणि भान शिक्षणाच्या माध्यमाने तिला दिल्यास हे शक्य होईल आणि व्यक्तीविकासाचा हा दृष्टीकोन हळूहळू सुधारकांनी जनमनात भरवायला, प्रारंभ केलाय म्हणून कोणत्याही मनूची मर्यादा शतकाच्या चतुर्थांश अगर फारतर अर्धशतकभर असते. अव्वल इंग्रजीत मनू कसाचा होता म्हणून विचारले तर तो इंग्रजीत इंग्रजी शिक्षणाचा होता असे चटकन उत्तर देता येईल. "आपल्या चालू शतकाच्या आरंभी स्त्री शिक्षणाचा मनू आहे असे दिसते."[३०] आणि म्हणूनच स्त्री शिक्षणाच्या मर्यादा आणि व्यापकता यावर अनुकूल प्रतिकूल मत प्रगटन होऊ लागते. पण स्त्रीशिक्षण हवे की नको याविषयी मात्र मतैक्य झाले होते. प्रो. कर्वे, महात्मा ज्योतिराव फुल्यांनी या दृष्टीने पावले उचलली होती. १८५१ साली फुल्यांनी पुण्यास मुलींसाठी शाळा सुरु केली सावित्रीबाई फुले यांना पहिली

स्त्री शिक्षीका होण्याचा बहुमान प्राप्त झाला. अजूनही स्त्री शिक्षणाचा अभ्यासक्रम ठरवतांना मात्र तिच्या बौध्दीक पातळीची वाढ कौटुंबिक सौख्याचे वलय न तोडता व्हावी या विचाराला प्राधान्य राहिले.

स्त्री शिक्षणाचे विषय:-

स्त्रीकडे बघताना ती अबला आहे असा दृष्टीकोन दृढमूल झाला होता. तसाच ती भावनाप्रधान असते त्यामुळे बुध्दीपेक्षा भावनेला ती प्राधान्य देते आणि त्यामुळे "आपल्या देशातील स्त्रिया जात्याच एखाद्या गोष्टीवर विचार न करीता भरंवसा ठेवीत असतात. त्यांच्या अंगातील हा दोष काढून टाकण्यास शिक्षणासारखे दुसरे उत्तम औषध नाही."[३१] म्हणून स्त्रीशिक्षण आवश्यक होते. स्त्री भावना प्रधान असल्यामुळे तिच्या शिक्षणात ललित-कला, वाङ्मय, धर्मशास्त्र, बालसंगोपन, आरोग्यशिक्षण, चित्रकला, गृहशास्त्र पाककला व भाषाविषयक ज्ञान आदी विषय असावेत. आदर्श माता व सुगृहिणी या दृष्टीने ती परिपक्व होईल हेच विषय अभ्यासक्रमात असावेत. गायनवादन कला, रेखाकला, तुलनात्मक धर्मशास्त्र स्वभाषेतील अभिरुचि वाढविण्यासाठी काव्य नाटकेव गद्यग्रंथ हे विषय दुसऱ्या टप्प्यातून द्यावे म्हणजे त्यांच्या बुध्दीवर जास्त ताण पडणार नाही. स्त्रीला उच्चशिक्षण द्यावयाचेच असेल तर समाजशास्त्र, इतिहास व राज्यघटना, मानसशास्त्र हे विषय असावेत. प्रो. कर्व्यांनी स्थापन केलेल्या युनिव्हर्सीटीत स्त्रियांच्या वरिष्ठ शिक्षणा संबंधाने विचार करत होते. स्त्री शिक्षणाचा कालावधी आणि त्या कालावधीतील अभ्यासक्रम याविषयीचे धोरण "स्त्री शिक्षणाचे ध्येय व दिशा" या लेखात प्रा. दा. गुणे यांनी स्वत:चे मत प्रगटण केले होते. "पुरुषांइतकाच किंबहूना जास्त महत्वाचा समाजाचा घटकावय स्त्रिया होत."[३२] आणि म्हणूनच सर्वांगिण विकास साधण्यास स्त्री शिक्षण आवश्यक आहे. स्त्री शिकून सुशिक्षित झाली पाहिजे असे मत व्यक्त केले.

"स्त्री शिक्षणातील सगण अपसगण":-

शिक्षणाचा प्रवेश तिच्या जीवनात झाल्यामुळे पर्यायाने तिच्या जीवनाचे स्वरुप बदलू लागले होते.

कुठलाही नवा विचार समाजमनात रुजायला कांही कालावधी जावा लागतो. आणि मग त्या विचारातील तथ्य प्रस्थापित व्हावयास सुरवात होते. अशा स्थितीत आक्षेप आणि हस्तक्षेप दोन्ही प्रकारचे वाद चालूच असतात. स्त्री शिक्षणाच्या बाबतीतही हेच घडले. स्त्री शिक्षणाकडे बघतांना तिच्या व्यक्ती विकासाचे टप्पे बघितले जात होते. पण स्त्री शिकून शहाणी झाली तर तिच्या बुध्दीवादी शहाणपणामुळे सामाजिक नितीमत्तेला धक्के बसतील. सुशिक्षित स्त्रिच्या कर्तृत्वाच्या कक्षा वाढतील. ती आर्थिक स्वातंत्र्य पण प्राप्त करून घेईल. समाजात वावरतांना या विकसित कक्षेत तिला पुरुषांबरोबर वावरावे लागेल. व त्यामुळे तिचे शील व समाजाची संस्कृति डागाळेल अशी अंतस्थ भिती या विचारसरणीच्या लोकांच्यात होती. कुटूंब विभक्त होतील, प्रौढकुमारिकेचा प्रश्न नव्यानेच उपस्थित होईल, संसारात या बायका लायक नसतील, अपेक्षा वाढतील पुरुषी वर्चस्वाच्या कल्पना दुखावतील, आणि कुटूंब व्यवस्था उध्वस्त होईल असा अपसमज स्त्री शिक्षणाविषयी होता. तसे स्त्रीची शरीररचना या शिक्षणाचे चांगले परिणाम आत्मसात करण्यास अडसर आणणारी आहे. म्हणून स्त्रियांचे शिक्षण आणि पुरुषांचे शिक्षण हा मतभेद मनांत ठेवून शरीरशास्त्रातील दाखले देऊन स्त्री शिक्षण पूरुष शिक्षणापेक्षा भिन्न असावे. असे प्रतिपादन केले आहे. स्त्री शरिराने कमकुवत आहे. कारण मातृपदप्राप्तीच्या वेळी व रजस्वलेच्या स्थितीत संपूर्ण विश्रांतीची तिला आवश्यकता असते. त्यामुळे ती शारीरीक व मानसिक बौध्दीक काम करण्यास या अवस्थेस अपात्र असते. असा निष्कर्ष काढून स्त्री शिक्षणाचा दृष्टीकोन संकुचित केला आहे. पण या विचारातील खरी मेख हीच आहे की, पुरुषी वर्चस्वाला आळा घालण्याचे सामर्थ्य स्त्रीला शिक्षणामुळे प्राप्त होईल. व त्यांचा अहंकार दुखवला जाईल. म्हणून लेखक म्हणतो. "ज्या मानववंशाला सामर्थ्यवान होऊन आपले मनुष्यबल वाढवावयाचे असेल त्या मानववंशाच्या पुढा-यांनी आपली वंशातील स्त्रियांना मातृपदाची जबाबदारी अंगावर घेण्याची नालायकी उत्पन्न करणारे पुरुषीशिक्षण न देण्याची काळजी घ्यावी."[३२] असे मत मांडून सुधारकी विचारांचा अंगीकार करता करता पुन्हा मूळ पदावर येऊन स्त्री शिक्षण या विषयाला

कलाटणी दिली आहे.

अशाही प्रतिकूल परिस्थितीत संभ्रमावस्थेत पंजाबातील स्त्री शिक्षणाच्या वाढत्या दर्जाचा आढावा समाजापुढे ठेवून, महाराष्ट्रीयन स्त्रियांनी व समाजानी स्त्री शिक्षणाला उचलून धरावे, त्याची व्यापकता लक्षात घ्यावी. म्हणून उद्दिपत करणारा एक लेख प्रसिध्द केला. त्यात आश्रमाकरीताइंग्रजीत भाषण देऊन अनुदान मिळवून देणा-या स्त्रियांचा उल्लेख आहे. तब्दत मुलींची प्रो. कर्व्यांच्या शाळेत काढणारी संख्या आनंददायक होती तशी प्रगती करणारी होती हे लक्षात येते. यावरून महाराष्ट्रातल्या स्त्रीचे शिक्षण पर्वातील स्त्री जीवन बघतांना हे स्पष्ट होते की, हया काळात द्विधा मन:स्थितीत समाज होता. स्त्री शिक्षण आदर्शमाता, सुगृहिणी, सुज्ञपत्नी व सहधर्मचारीणी, होण्यास आवश्यक आहे पण या शिक्षणामुळे आपण धार्मिक संकेतावर आजवर जोपासलेली आपली संस्कृति कदाचित डागाळेल. सामाजिक नीतिमूल्याची धसरण होईल, नैतिक अध:पतन वाढेल, स्त्रीच्या शिक्षणाचा व व्यक्ती स्वातंत्र्याचा विचार हे पाश्चात्यांचे व्यक्तीस्वातंत्र्याचे अनुकरण आहे. पण आपली विचारसरणी वेगळयाच मूल्यांवर अधिष्ठीत आहे. तिला जर धक्के बसले तर जो विकास साधायचा तो न साधता आपण अजूनच अधोगतीच्या मार्गाला लागू. "समाजात एकाच वेळी निरनिराळया मूल्यसरणी असू शकतात आणि शास्त्रीय सिध्दांताशी त्याचा निकटचा संबंध असतो. हे मान्य केले तरी वेगवेगळया दृष्टीकोनातून प्रतिपादीलेला सिध्दांतापैकी कोणते सिध्दांत प्रमाण मानावयाचे हा प्रश्न शिल्लक राहतोच[३४] आणि याची साधक बाधक चर्चा झाल्या शिवाय त्यातील प्रथितसत्य समाजाच्या गळी उतरतच नसते. आणि महाराष्ट्रीय स्त्रीच्या जीवनाला आलेली अगतिकता, दूरदृष्टी असलेल्या व उदारमतवादी विचार सरणीच्या कांही लोकांना पटली होती. स्त्रीला स्वातंत्र्य द्यावे आणि स्त्रीला बंधातच ठेवावे अशया दोन विचारसरणीतूनच स्त्रीचे जीवन दोलायमान स्थितीत होते हे स्पष्ट होते. हेसारेच शिक्षणाच्या अभावामुळे झालेय हेही पटले होते. स्त्रीयांना बुध्दी विकासाची संधी मिळावी हे खरे. "पण सध्या स्वदेश भगिनीच्या सांप्रत स्थितीकडे बघीतले असता मान खाली घालण्याची वेळ येते."[३५]

इतकी तिची परिस्थिती सोचनिय आहे. आणि म्हणूनच तिच्या जीवनात अमूलाग्र बदल घडला पाहिजे हेच सांप्रतच्या लेखातून दिसून आले आहे.

समारोप

विविधज्ञान विस्तारात प्रसिध्द झालेल्या लेखातून जे स्त्रीजीवनाचे एकंदरीत दर्शन घडले ते संक्षेपाने असे, बालविवाह, बालाजरठविवाह हे प्रश्न समाजात प्रचलित होते. कन्याविक्रीय होत होता, देवदासीची चाल समाजातील भोगी वृत्तीचे दर्शक होती, समाजाने स्त्री शिक्षणाचा पुरस्कार केला होता पण बदलणा-या स्त्रीचे चित्र तिच्या व्यक्ती विकासामुळे वाढणारी तिची बौध्दीक पातळी, आजपर्यंतच्या पुरूषशाहीच्या दंडुकीशाहीला धक्का देणारी ठरू शकेल ही भिती मनात घर करून बसली होती. शिकून शहाणी झालेली स्त्री कुटूंबसंस्था टिकवणार नाही ही भिती होती. विधवा स्त्रियांच्या विषयी समाजमनात सहानुभूती निर्माण झाली होती. पतिच्या माघारी तिचे आयुष्य काष्टवेश अवस्थेतच तिने घालवावे केशवपनाच्या चालीचे हळू हळू समाजातून निर्मूलन होत होते. बालविधवेने ही पुनर्विवाह करू नये अशा दुष्ट आग्रहामुळे समाजात बालविधवांचे जीवन दुःखीकष्टी अवस्थेत होते. सामाजिक नीतिनियमांना पालन फक्त स्त्रीयांनी करावे, तिने वैयक्तिक सुखदुःखापेक्षा रूढीला जास्त महत्व द्यावे, अशा दृष्टीकोनातून स्त्रियाकडे बघतांना फक्त सहानुभूतीने बघायला समाज शिकू लागला होता. पण स्त्रियांची परवशता फारशी कमी झाली नव्हती.

शिक्षणाच्या माध्यमातून ही दुरावस्था, परवशता दूरकरण्याचा प्रयत्न ही कांही लेखातून झाला पण गृहीणी, पंचरत्नमाला, सुगृहिणी, खरे प्रेम, सुपत्नी, गुणवती स्त्री अशा लेखांमधून तिच्या शालीनतायुक्त मर्यादेची जाण सतत तिला करून दिली जात होती. स्त्री शिक्षणाची मतप्रणाली मान्य पण गृहचौकटीची शोभावाढवणाऱ्या विषयांचेच तिला शिक्षण दिले जावे हा विचार केला जाऊ लागला. तर काही शिकलेल्या स्त्रिया अन्यायाविरूध्द प्रतिकार शक्तीचे सामर्थ्य वाढवित होत्या.

हया सर्व लेखांमधून बहूणन समाजातील स्त्रीचे दुःख कुठे दिसत नाही.

मध्यमवर्गीय पांढरपेशा समाजातच हे परिवर्तनाच्या विचारांचे चक्र फिरत होते. समाजचित्र बालविवाह, सासुरवास या लेखातून स्त्री जीवनाचे दर्शन होते.पण ही स्त्री मध्यमवर्गीय आहे हे लक्षात येते. स्त्रियांचा पुनरुध्दार या लेखात विधवाविवाह प्रौढ विधवा विवाह मुरळ्यांची समस्या घेऊन मात्र दु:खीत स्त्रीला दिलासा देण्याचे कार्य केले. प्रो. कर्वेयांची स्त्री शिक्षण संस्था व पंढरपूर येथील अनाथगृह, रमाबाई रानडे यांचे शारदा सदन, स्त्री समस्या निर्मूलनाचे केंद्र होते. माता, गृहिणी, पत्नी, भगिनी, या विविध स्मात दिसणा-या स्त्रीचे रूप येथे प्रस्तुत लेखमालांतून स्पष्ट होते. व जे चित्र इतरत्र भारतात दिसत नव्हते ते महाराष्ट्रातील स्त्रियांच्यात दिसून येते. कारण महाराष्ट्रातील विचारवंतांनी स्त्रीच्या दुर्दशेचा, परवशतेचा विचार मानवी मुल्ये समोर ठेवून केला होता. तिची खालावलेली परिस्थिती सोचनिय असल्याने तिचे दु:ख समजून घेण्याचा प्रयत्न केला गेला होता. पण अजूनही बहुसंख्य स्त्रिया या प्रबोधनाच्या लाटे पासून खूप दूर होत्या. हे येथे आवर्जून नमूद करावेसे वाटते. ग्रामीण स्त्रीजीवनाचा कुठेही उल्लेख नाही. सासुरवास आहे तो मध्यमवर्गीय स्त्रीचा, शिक्षणाने सर्वांगिण विकास साधतांना पांढरपेशा स्त्रीलाच प्राधान्य दिले गेले.जे दु:ख सोचनियता मांडली ती पांढरपेशी स्त्रीचीच आहे तरीही असे म्हणावे लागेल की इतर प्रदेशापेक्षा महाराष्ट्राचे तत्कालीन स्त्री जीवन प्रबोधनाच्या पाऊलवाटेवर होते.

= ० =

संदर्भ सूची

१) भालचंद्र फडके — मराठी लेखिका चिंता आणि चिंतन
आ॰ १ली पान नं॰१७

२) रा॰ शं वाळिंबे — महाराष्ट्राची सामाजिक पुनर्घटना
भाग पहिला आ॰ प॰१९६२
पान नं॰ ३४

३) सं॰ गं॰ बा॰ सरदार — महाराष्ट्र जीवन
परंपरा, प्रगति आणि समस्या
आ॰ १ १९६० पान १५९

४) आचार्य शं॰ द॰ जावडेकर — आधुनिक भारत
आ॰ तिसरी १८९० पान नं॰६१

५) लोकहितवादी कृत निबंध — सं॰ अ॰ का॰ प्रियोळकर
आ॰ दुसरी १९६७ पत्र नं॰१०
पुनर्विवाह

६) विविध ज्ञान विस्तार — अंक १
जुलै १८६५

७) विविधज्ञान विस्तार — १९२६ मे चा अंक
५० वर्षाच्या वाटचालीचा आढावा
नी॰ बं॰ भागळकर

८) सं॰ निर्मलकुमार फडकुले	गं॰ बा॰ सरदार यांचे निवडक लेख प्रबोधनाच्या पाऊलखुणा आ॰ १ १९७८ पान नं॰ १४
९) सं॰ स॰ ग॰ मालशे	स्त्री पुरुष तुलना सौ॰ ताराबाई शिंदे पान नं॰ ७॰८॰ आ॰ १
१०) विविधज्ञान विस्तार	स्त्रियास उपदेश अ॰ अं॰ पा॰ ३: ९ : ११४
११) विविधज्ञान विस्तार	स्त्रियांचे भूषण पु॰ अ॰ पा ४ : ४ :६४
१२) विविधज्ञान विस्तार	मुलीचे लग्न पु॰ अ॰ पा॰ ५ : ५ : ९७
१३) विविधज्ञान विस्तार	बाल विधवेचा अनुभव सौ॰ कमळाबाई किबे पु॰४८ अं ८ पान ३३१

१४)	विविधज्ञान विस्तार	बाल विवाह पेंची फेपिसनबाई पु॰२२ अं॰ १० पान २१८
१५)	कित्ता	पेंचीफेपिसनबाई पान २२०
१६)	कित्ता	फडकुले
१७)	सं॰ निर्मलकुमार फडकुले	लोकहितवादी कृत निबंध संग्रह पुनर्विवाह पत्र १० पान २०
१८)	विविधज्ञान विस्तार	सुगृहिणी दा॰ ग॰ पाध्ये पु॰ ४५ अं॰ ७ पान नं॰२४१
१९)	विविधज्ञान विस्तार	अहिल्योध्दार ना॰ के॰ बेडेरे कृत (श्री॰ द॰ शिंदोरे) पु॰ ६२, अं॰ २ पान नं॰७२
२०)	कित्ता	—॥—

२१)	विविधज्ञान विस्तार	स्त्रियांचा पुनरुध्दार रा॰ रा॰ भागवत पु॰ २९ अं॰ ३ पान नं॰ ८४
२२)	विविधज्ञान विस्तार	अंतिम साहय मासिक समालोचन पु॰ ३८ अं॰ ८ पा॰
२३)	कित्ता	
२४)	कित्ता	
२५)	विविधज्ञान विस्तार	डॉ॰ आनंदीबाई जोशी ह॰ म॰ पंडीत पु॰ १९ :१-२ ४२
२६)	विविधज्ञान विस्तार	मिसेस कृपाबाई सत्यनाथन बा॰ ना॰ देव पु॰ ३० अं॰ १२ पा॰ ३९३
२७)	विविधज्ञान विस्तार	शहरवासी स्त्रियांची मिणाण वाढली आहे ती चांगली आहे काय१ पु॰ ३१ अं॰ ११-१२ पा॰३४५
२८)	दु॰ का॰ संत	मराठी स्त्री आ॰ पहिली १९५७ आगरकर व त्यांचे युगमान पान नं॰ १९८

२९)	विविधज्ञान विस्तार	स्त्री शिक्षणाचे उद्देश्य व दिशा पा॰ दा॰ गुणे पु॰ ४७ अं॰ ८ पान ३२४
३०)	विविधज्ञान विस्तार	भारत वर्षीय युवती रत्नमाला पु॰ ३१ अं॰ ८ पा॰ २४६
३१)	विविधज्ञान विस्तार	स्त्री शिक्षणाचे ध्येय व दिशा पा॰ दा॰ गुणे पु॰ ४७ अ॰८ पान ३४३
३२)	विविधज्ञान विस्तार	स्त्री जीवनावर प्रकाश गो॰ म॰ चिपळूणकर लेखांक १ पु॰ ५९ अं॰ १० पान ४१९
३३)	सं॰ निर्मल कुमार फडकुले	प्रबोधाच्या पाऊलखुणा गं॰ बा॰ सरदार यांचे निवडक लेख पान नं॰ १४ आ॰
३४)	विविधज्ञान विस्तार	पुस्तक परीक्षा इंदिरा पु॰ १७ अ॰ ४ पान ८७